। लातूर । वर्ष ३४ वे । अंक २७८ वा । बुधवार, दिनांक २८ जानेवारी २०२६ । पृष्ठे ६ । किंमत १ रू.

RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR

(सांज दैनिक)

प्रकाशन: लातूर

पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

Email-dainiklatursamachar@gmail.com

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)    कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा विमान अपघातात मृत्यू

## विमानातील पाचही प्रवाशांचे निधन; पीएम मोदी–अमित शाह उद्या बारामतीत येणार



**पुणे/प्रतिनिधी:** महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार (६६) यांचे निधन झाले आहे. बुधवारी सकाळी बारामती येथे त्यांचे विमान कोसळले. बारामती विमानतळावर लँडिंग दरम्यान हा अपघात झाल्याचे वृत्त आहे. विमानात त्यांच्यासोबत असलेले त्यांचे वैयक्तिक सहाय्यक, सुरक्षा कर्मचारी आणि विमान कर्मचाऱ्यांचाही मृत्यू झाला.

अजित पवार पंचायत निवडणुकीसाठी जाहीर सभेला संबोधित करण्यासाठी बारामतीला जात होते. महाराष्ट्र हवाई वाहतूक विभागातील सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, विमान लँडिंगसाठी बारामती विमानतळाजवळ येत होते. सुरुवातीला पायलटला धावपट्टी स्पष्ट दिसत नव्हती, म्हणून त्याने विमान जास्त उंचीवर नेले. रिपोर्टनुसार, त्यावेळी दृश्यमानता सुमारे २ हजार मीटर होती.

विमान लँडिंगचा पहिला प्रयत्न अयशस्वी झाल्यानंतर, बारामतीच्या धावपट्टी ११ वर उतरण्याचा दुसरा प्रयत्न करण्यात आला. या दरम्यान, विमान धावपट्टीवरून घसरले आणि क्रॅश झाले. त्यानंतर लगेचच त्यात आग लागली. लँडिंग दरम्यान पायलटने कोणतेही आपत्कालीन सिग्नल दिले नाहीत असेही वृत्त आहे. त्याने मेडे कॉल देखील केला नाही. घटनेच्या वेळी बारामती फ्लाइंग क्लबमध्ये कोणतेही विमान उडत नव्हते.



### विमान अपघातावेळी विमानात कोण कोण होते?

अजित पवार

मुंबई पीएसओ HC विदीप जाधव

पायलट कॅप्टन सुमित कपूर

कॅप्टन संभवी पाठक

पिंकी माळी, फ्लाईट अटेंडंट

### एक खंबीर नेता व माझ्या मंत्रिमंडळातील उमदा सहकारी गमावला- उद्धव ठाकरे

''एक खंबीर नेता व माझ्या मंत्रिमंडळातील उमदा सहकारी गमावला,'' अशा शब्दांत शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण केली.

उद्धव ठाकरे यांच्या मंत्रिमंडळात अजित पवार हे उपमुख्यमंत्री, अर्थमंत्री होते. अत्यंत शिस्तप्रिय, आपल्या खात्यावर वचक व अर्थ विभागाचा अभ्यास असणारे ते नेते होते. एक उत्तम सहकारी म्हणून त्यांचे माझे विशेष नाते जमले. अजित पवार हे दिलखुलास होते. मनात येईल ते बोलायचे. ते दीर्घद्वेषी नव्हते. राजकारणात त्यांनी वेगळा मार्ग स्वीकारला, तरी त्यांनी संबंध तुटू दिले नाहीत, असे उद्धव ठाकरे यांनी सांगितले.

महाराष्ट्रात ते 'दादा' म्हणून लोकप्रिय होते. ते असे अकाली जातील असे वाटले नव्हते. कार्यकर्त्यांना जपणारा नेता म्हणून ते परिचित होते. त्यांच्या जाण्याने राज्यातील नेतृत्वात पोकळी निर्माण झाली. ते सर्वार्थाने 'दादा' होते. दादांना माझ्यातर्फे, 'ठाकरे' व शिवसेना परिवारातर्फे श्रद्धांजली!

### अजित पवारांच्या जाण्याने महाराष्ट्राचे मोठे नुकसान झाले : नितीन गडकरी

अजित पवार माझे घनिष्ठ मित्र होते. माझे आणि त्यांचे कौटुंबिक संबंध होते. उत्तम प्रशासक आणि विकासाची दूरदृष्टी असलेले ते नेते होते. त्यांच्या जाण्याने महाराष्ट्राचं मोठं नुकसान झालं आहे. पवार कुटुंबियावर हा मोठा आघात आहे. माझ्या या सहकाऱ्याला मी भावपूर्ण श्रद्धांजली वाहतो, नितीन गडकरी यांची भावनिक प्रतिक्रिया

### अजित पवारांच्या निधनानंतर रितेश देशमुख हळहळला

एका दुःखद अपघातात आपण अजित दादांना गमावले आहे, हे ऐकून मला खूप मोठा धक्का बसला आहे आणि मन सुन्न झाले आहे. महाराष्ट्राच्या सर्वात गतिमान नेत्यांपैकी एक असलेले अजित दादा कामात हलगर्जीपणा अजिबात सहन करत नव्हते आणि ते आपल्या सभोवतालच्या लोकांना उत्कृष्ट कामगिरी करण्यासाठी सतत प्रेरित करत असत. ते स्पष्टवक्ते होते, त्यांची विनोदबुद्धी अतुलनीय होती आणि संपूर्ण राज्यात ते सर्वांचे लाडके होते. त्यांच्या अकाली निधनामुळे एक मोठी पोकळी निर्माण झाली आहे, जी कधीही भरून येणार नाही. मला त्यांच्याशी अनेकदा संवाद साधण्याची संधी मिळाली, आणि त्यांनी माझ्यावर केलेल्या प्रेमाबद्दल मी त्यांना नेहमीच स्मरणात ठेवीन. पवार कुटुंब, त्यांचे प्रियजन आणि लाखो समर्थकांप्रति मी माझ्या मनःपूर्वक संवेदना व्यक्त करतो, अशा शब्दांत अभिनेता रितेश देशमुख याने संवेदना व्यक्त केल्या.

### पंतप्रधान मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह उद्या बारामतीत येणार

अजित पवार यांच्या पार्थिवावर उद्या बारामतीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह हे उद्या अजित पवारांच्या अंत्यसंस्कारासाठी बारामतीत येणार आहेत.

### राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्याकडून संवेदना व्यक्त

महाराष्ट्र आणि गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी आज सकाळी बारामतीजवळ झालेल्या विमान अपघातात महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे.

बारामतीजवळ झालेल्या विमान अपघातात महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री श्री अजित पवार यांच्या अकाली निधनाने मला खूप दुःख झाले आहे. मी श्री अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण करतो आणि शोकाकुल कुटुंबातील सर्व सदस्यांप्रति माझ्या मनःपूर्वक संवेदना व्यक्त करतो. ओम शांती. असे राज्यपाल आचार्य देवव्रत म्हणाले.

### दादा गेले !; मुख्यमंत्री -श्री देवेंद्र फडणवीस

जमिनीशी घट्ट नाळ असलेले जननेते,माझे मित्र आणि सहकारी, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचा विमान अपघातात मृत्यू झाल्याची घटना मनाला अत्यंत व्यथित करणारी आहे.मनाला चटका लावणारी आहे.मन सुन्न झाले आहे. भावना व्यक्त करण्यासाठी माझ्याकडे शब्द नाहीत.

माझा दमदार आणि दिलदार मित्र मी गमावला आहे.माझ्यासाठी ही वैयक्तिक हानी आहे.हे कधीही भरून न येणारे नुकसान आहे. आजचा दिवस महाराष्ट्रासाठी अतिशय कठीण आहे. मी दादांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो.

त्यांच्या संपूर्ण कुटुंबियांच्या आणि राष्ट्रवादी काँग्रेस परिवाराच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत.या अपघातात अन्य ४ जणांचा मृत्यू झाला.त्यांच्याही कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. माझे सर्व कार्यक्रम मी रद्द केले आहेत. थोड्याच वेळात बारामतीसाठी निघतो आहे.

### माझा मोठा भाऊ गेल्याची भावना; उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भावपूर्ण श्रद्धांजली

**मुंबई/प्रतिनिधी:** राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादांच्या अपघाती निधनाची बातमी अविश्वसनीय आणि धक्कादायक आहे. ते माझ्यापेक्षा अनुभवाने आणि वयानेही मोठे होते. त्यांच्या निधनाने माझा मोठा भाऊ गेल्याची भावना माझ्या मनात आहे. महाराष्ट्रासाठी आजचा काळा दिवस असून एक दूरदर्शी, स्पष्टवक्ता आणि अतिशय अभ्यासू नेता आपण गमावला आहे. महायुती सरकारमधले ते केवळ माझे सहकारी नव्हते तर माझे चांगले मित्रही होते. त्यांचं अकाली जाणं जीवाला चटका लावणारं आहे अशा भावपूर्ण शब्दात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी श्रद्धांजली वाहिली आहे.

उपमुख्यमंत्री श्री. शिंदे आपल्या शोकसंदेशात म्हणतात की, महाराष्ट्र त्यांना दादा म्हणून ओळखायचा आणि ते तसे होते. त्यांच्याकडे 'वेळ' साधण्याचा अप्रतिम गूण होता. त्यांच्या कामाचा झपाटा आणि निर्णयक्षमता आम्ही सगळ्यांनी अनुभवली आहे. मी केवळ सहकारी म्हणूनच नाही तरी मित्र म्हणून सुद्धा त्यांच्या व्यक्तिमत्वाच्या पैलुंना जवळून पाहिलं आहे. अजितदादांच्या स्पष्ट आणि नर्म विनोदी, मार्मिक कोपरखळ्यांची वैशिष्ट्ये सुद्धा सगळ्यांना आवडत.

आमचं सरकार तीन पक्षांचे असले, तरीही निर्णय मात्र एकसंधपणे आणि एकजूटीने घेत आलो आहोत. विशेषतः अगदी प्रारंभीपासून राज्याची आर्थिक घडी चांगली बसावी यासाठी राज्याचा वित्तमंत्री म्हणून अजित दादांनी विकास कामांना खीळ बसू न देता अतिशय हातोटीने निर्णय घेतले. राज्यातील अनेक पायाभूत विकास प्रकल्पांना चालना देण्यासाठी मी मुख्यमंत्री असतांना मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना असो किंवा इतर काही योजना असो, उपमुख्यमंत्री आणि वित्तमंत्री म्हणून अजितदादा यांनी वेळोवेळी पाठबळच दिले.

परखड आणि जिथल्या-तिथे निर्णय घेण्याची क्षमता म्हणून दादांचा महाराष्ट्राला परिचय होता. वित्तमंत्री म्हणून त्यांच्याकडे सगळ्याच खात्यांबाबत माहिती असायची. पण म्हणून त्यांनी कधी शिष्टाचाराची चौकट मोडली नाही. धोरणात्मक निर्णय जाहीर करतानाही त्यांनी कधी कुणाला अव्हेरल्याचे दिसत नाही. आपले म्हणणे ते सूस्पष्टपणे आणि अधिकारवाणीने मांडत. त्यांचा हा स्पष्टवक्तेपणा धोरणात्मक बैठका आणि विधिमंडळ सभागृहातही अनुभवायला आला.

स्वप्नाळू सादरीकरण आणि केवळ सांगोवांगी गोष्टींपेक्षा ते व्यावहारिक गोष्टी पडताळून पहात. एखादी संकल्पना पुढे आली, की तिचा ते सर्वांबाजूंनी विचार करायला भाग पाडत. ती संकल्पना टिकेल कितपत, तिच्या भविष्यातील देखभालीची व्यवस्था इथपासून, ती लोकहिताची आहे का, कितीजणांसाठी ती उपयुक्त ठरणार आहे, अशा अनेक गोष्टींचा ते विचार करत. ठोस आणि तडकपणे निर्णय घेत असल्याने विधिमंडळातील आमदार आणि मंत्रिमंडळातील होतकरू-तरूण मंत्र्यांनाही अजितदादांच्या कार्यशैलीबाबत, दैनंदिनीबाबत कुतूहल असायचे. त्यांनाही वेळप्रसंगी ठणकावयाला ज्येष्ठत्वाच्या नात्याने दादा मागे पुढे पाहत नसत. छोट्या-मोठ्या गोष्टींचाही लोकप्रतिनिधींनी विचार करायला हवा. आपल्या निर्णयाचा लोकांच्या जीवनावर कसा आणि काय परिणाम होतो, याचा अभ्यास करायला हवा असा त्यांचा आग्रह असायचा. त्यामागे चूका काढण्याची नव्हेतर, त्यांची पुनरावृत्ती होऊ नये याची तळमळ असायची.

आज दादा आपल्यात नाहीत ही कल्पना सुद्धा मनाला पटत नाही. मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो असेही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे शेवटी म्हणतात.

## महाराष्ट्राचा आपला 'दादामाणूस' आणि विकासाचा कणा हरपला!

### अजित पवार यांना आमदार अमित देशमुख यांची आदरांजली

### लातूरचे सर्व राजकीय कार्यक्रम रद्द

**लातूर/प्रतिनिधी :** बारामती येथील विमान अपघातात राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री माननीय अजित पवार साहेब यांच्या निधनाचे वृत्त अत्यंत धक्कादायक आणि सुन्न करणारे आहे. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राच्या राजकीय पटलावरील एक धडाडीचे, स्पष्टवक्ते आणि विकासाभिमुख नेतृत्व काळाच्या पडद्याआड गेले

आहे. या दुःखद घटनेमुळे संपूर्ण महाराष्ट्र शोकाकुल झाला असून, लातूरचे आमदार अमित विलासराव देशमुख यांनी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे.

'जे होईल ते होईल' म्हणणारा स्पष्टवक्ता नेता हरपला श्रद्धांजली वाहताना आमदार अमित देशमुख म्हणाले की, अजितदादा हे केवळ एक नेते नव्हते, तर महाराष्ट्रातील प्रत्येक घराघरांत मानले जाणारे 'दादामाणूस' होते. प्रशासनावर त्यांची मजबूत पकड होती. 'जे काम होऊ शकते ते होईल' आणि 'जे होणार नाही ते स्पष्टपणे सांगणारे' ते महाराष्ट्रातील एकमेव निर्भीड नेते होते. सुस्पष्ट दृष्टिकोन आणि काटेकोर नियोजन ही त्यांची खास ओळख होती.विलासराव देशमुख आणि अजितदादा: एक अतूट नाते अजितदादांच्या आठवणींना उजाळा देताना आमदार देशमुख यांनी नमूद केले की, माजी मुख्यमंत्री आदरणीय विलासराव देशमुख साहेब यांच्या मंत्रिमंडळात दादांनी उपमुख्यमंत्री म्हणून अतिशय प्रभावी कार्य केले. पक्ष वेगळे असले तरी, पक्षाभिनिवेश बाजूला ठेवून ते आदरणीय साहेबांचा नेहमी 'माझे आवडते मुख्यमंत्री' म्हणून उल्लेख करत. यातूनच त्यांच्या मनाचा निर्मळपणा आणि खिलाडूवृत्ती दिसून येत असे.महाविकास आघाडी सरकारच्या काळात मंत्री म्हणून काम करताना दादांशी आलेला निकटचा संपर्क आणि त्यांचे लाभलेले सहकार्य हे कायम स्मरणात राहील, अशी भावना अमित देशमुख यांनी व्यक्त केली. अलीकडच्या काळातही त्यांच्या भेटीत तीच आपुलकी आणि सहकार्याची भावना अनुभवायला मिळाली, असे त्यांनी नमूद केले.

या भीषण अपघातामुळे आणि अजितदादांच्या निधनामुळे निर्माण झालेल्या शोकाकुल परिस्थितीचा विचार करून, आज लातूर जिल्ह्यातील काँग्रेस पक्षाचे सर्व नियोजित प्रचार कार्यक्रम, बैठका आणि सभा रद्द करण्यात येत आहेत, अशी घोषणा आमदार अमित देशमुख यांनी केली आहे.

आम्ही सर्व देशमुख कुटुंबीय, पवार कुटुंबीयांच्या या दुःखात सहभागी आहोत. महाराष्ट्राच्या या लाडक्या नेतृत्वाला मी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो आणि पवार कुटुंबीयांना हे दुःखसहन करण्याची शक्ती मिळो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना अशा शब्दात आपल्या भावना आमदार देशमुख यांनी व्यक्त केली.

महाराष्ट्रातल्या राजकारणातील रोखठोक व्यक्तिमत्व राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे विमान अपघातात दुःखद निधन झालं त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो

राज्याच्या सहकार, कृषि, क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत मंत्रिमंडळात उत्तम प्रशासक म्हणून ओळखले जाणारे अजितदादा पवार यांच्या जाण्याने राज्यातील लोकाभिमुख चेहरा हरवला आहे पवार कुटुंबाच्या दुःखात देशमुख परिवार सहभागी आहे ओम् शांती

– दिलीपराव देशमुख माजी मंत्री महाराष्ट्र सहकार महर्षी लातूर

### आमच्या आयुष्यातील आज सर्वात वाईट दिवस : जयंत पाटील

राष्ट्रवादी परिवारातील आम्हा सर्व सहकाऱ्यांच्या आयुष्यातील आजचा दिवस सर्वात वाईट दिवस आहे असेच म्हणावे लागेल. अजितदादांच्या निधनाची बातमी ही अक्षरशः सुन्न करून टाकणारी आहे. अजितदादा आणि माझे गेल्या जवळपास ३५ ते ४० वर्षांपासूनचे मैत्रीपूर्ण संबंध होते प्रदीर्घकाळ आम्ही एकत्र काम केले.

महाराष्ट्राच्या राजकीय सार्वजनिक जीवनाला अजितदादा पवार यांच्याकडून अजून मोठ्या कार्याची अपेक्षा असतानाच अशा प्रकारे अजित दादांचे अपघाती निधन आम्हा सर्वांच्या राजकीय जीवनात एक कायमस्वरूपी पोकळी निर्माण करून गेलेले आहे. दादांच्या निधनाने महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनाचे जे नुकसान झाले आहे ते नुकसान कधीही भरून निघणार नाही.

महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनातील एक सर्वाधिक उत्तम प्रशासक व एक अत्यंत मोठा लोकनेता महाराष्ट्राने कायमचा गमावला आहे. अजित दादांची उणीव कायम भासत राहील.

### अजित पवारांनी सुरू केलेले कार्य पुढे चालू ठेवुया, गौतम अदाणींनी

राज्यात आज मोठा दुःखाचा डोंगर कोसळला आहे. कारण, राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं अपघाती निधन झालंय. बारामती येथे विमान लँड होत असताना तांत्रिक बिघाड झाल्याने अपघात झाला. या अपघातात पाच जणांचा मृत्यू झाला आहे. त्यांच्या निधनावर अनेकांनी प्रतिक्रिया व्यक्त केला आहेत. तसंच, प्रसिद्ध उद्योगपती गौतम अदाणी यांनीही प्रतिक्रिया दिली आहे.

गौतम अदाणी म्हणाले, महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाने खूप दुःख झाले. महिन्याभरापूर्वी, आम्ही बारामतीमध्ये शरद पवार सेंटर ऑफ एक्सलन्स इन एआयच्या उद्घाटनासाठी एकत्र होतो. हा क्षण अजितजींच्या दृष्टिकोनाचे, प्रगतीवरील त्यांच्या विश्वासाचे आणि भारताच्या तरुणाई, त्यांच्या भविष्याप्रती असलेल्या त्यांच्या वचनबद्धतेचे प्रतिबिंबित करतो. भविष्यासाठी महाराष्ट्र उभारण्यासाठी त्यांनी केलेले कार्य पुढे चालू ठेवून आपण त्यांच्या वारशाचा सन्मान करूया. त्यांच्या आत्म्याला शांती लाभो.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## निरोगी आयुष्य जगले पाहिजे.

भारतीयांनी आरोग्याची काळजी घेतली पाहिजे. वाढते प्रदुर्शन, दुषीत वातावरणाचा मोठा परिणाम आरोग्याबरोबर जीव सृष्टीवर होत आहे. काही जीवसृष्टी लोप पावत आहेत. हे मोठे संकट मानवावर येत आहे. त्यामुळे मानवाने जीवसृष्टी वाचविण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. त्या प्रमाणे आपले आरोग्य निरोगी कसे राहील याचा विचार केला पाहिजे. जगात तसे पाहिले तर भारतीय जीवनप्रणालीस तोड नाही. भारतीयांना अनेक आरोग्यविषयक ज्ञान आहे. वैदिक काळात त्यांचा बोलबाला होता. जगात कोठेही उपचार पद्धती उपलब्ध नसताना भारतात ती यशस्वी केली जात होती. आयुर्वेदाच्या जोरावर अनेक असाध्य रोगावर उपचार होत होता. अनेक विविध रोगावर शस्त्रक्रिया केली जात होती. त्याच प्रमाणे अनेक वनस्पतीचा शोध घेतला जात होता. यात संशोधन केले जात होते. भारतीय आयुर्वेदिक उपचार पद्धत ही प्रभावशाली आहे. त्याच प्रमाणे याला तोड नाही. त्यामुळे जगच आता आयुर्वेदाचे ज्ञान हस्तगत करण्याकडे कल दिसून येत आहे. भारतीय आयुर्वेदाच्या साह्याने इतर देशात असाध्य रोगउपचार केले जात आहेत ते यशस्वी होताना दिसून येत आहेत. रामायणच्या काळात जाडपालाच्या उपचाराने लक्ष्मणला शुद्ध आली व वाचविले. द्रोणागीरी पर्वतावर अनेक वनस्पती आहेत. सध्याला गंगेचे पाणी शुद्ध का समजात तर हिमालयात अनेक औषधी झाडे आहेत त्या भागातील पाणी गंगानदीत मिसळले जाते. औषधी वनस्पती पाण्यात मिसळल्याने काही रोगमुक्त या पाण्यामुळे होतो, हे उघड आहे. भारतातील निसर्ग हा निरोगी समजला जात होता परंतु अनेक कारखानदारीतून निघणारा धुर व दूषीत पाण्याचा परिणाम हा निसर्गावर होताना दिसून येत आहे. यामुळे आलिकडे असाध्य रोग निर्माण होत आहेत. पुर्वी असाध्य रोग नव्हते. पुर्वीची जीवनशैली व आताची जीवनशैलीत मोठी तफावत आहे. राहाणीमान व खानपान बदलते आहे. सर्वात मोठा व्यायामाचा अभाव आहे. पुर्वी ताकदीचे कामे केली जात, आता मशिनरीद्वारे कामे केली जात असतल्याने श्रमाला महत्व कमी दिसून येते. श्रमातून निघणारा घाम हा शरिरातील दुषीत पदार्थ बाहेर फेकतो. सध्याला श्रम कमी असल्याने शरिरातील घामाद्वारे निघणारा दुषीत पदार्थ तसाच शरिरात राहीला जात आहे. पुर्वी व्यायाम व प्राणायामला महत्व दिले जात होते ते आता नाही. चालणे जवळपास बंदच झाले आहेत. पुर्वी फार तर सायकल असायाची आता. मोटारसायकलने प्रवास वाढला गेला. पाच पावले कोणी चालत नाहीत. सकाळी स्वच्छतेसाठी जाताना मोटारसारयकलवरून जातात हे चित्र आता ग्रामीण भागात दिसून येत आहे. ग्रामीण भागात मोटारसायकलचे प्रमाण वाढले आहे. घरोघरी मोटारसायकलचा वापर वाढला आहे. त्यामुळे श्रमाद्वारे होणारा व्यायाम लोप पावला आहे. ग्रामीण भागात प्रत्येक गावात व्यायाम शाळा असावयाच्या पहाटे दंड-बैठकाचा आवाज सर्वत्र ऐकू येत होता. गावातील मुले हे व्यायाम शाळेत असाचयाची. नंतर ते विहीरीवर पोहण्यात मग्न असायाची. आता ते चित्र दिसून येत नाही. त्यामुळे ग्रामीण भागात आता मधुमेह व रक्तदाबाचे रुग्ण वाढले आहे. पुर्वी डायबिटीस हा ग्रामीण भागात नव्हता. आता त्याने मोठ्या प्रमाणात शिरकाव केला आहे. ग्रामीण भागात असाध्य रोगाने शिरकाव केला आहे. हे कशाचे प्रतिक आहे तर व्यायामाचा अभावाचे आहे. श्रमाचा अभावामुळे असाध्य रोग वाढले आहेत हे कोठेतरी मान्यच केले पाहिजे. सध्याला रामदेव बाबा मोठा आयुर्वेदाचा प्रचार करीत आहेत. केवळ जडीबुटीचा वापर करीत आहेत. आयुर्वेदात मोठे संशोधन करून असाध्य रोगावर संशोधन करून ते ज्ञान देशातील नागरिकांना वाटत आहेत. सर्वात स्वस्तात असणारी औषध हे आयुर्वेदिक आहेत. परिणाम कारक आहेत. याआयुर्वेदाचा साईड इफेक्ट नाही. फायदा झाला नाही तरी नुकसान होत नाही. असे आयुर्वेदिक आहे. आयुर्वेक ही विद्या भारतीयांची आहे. भारतीय ही विद्या परदेशीयांनी घेवुन गेले आहेत. परदेशात याचे संशोधन चालू आहे. भारतात अनेक वनस्पती अशा आहेत की, विविध रोगमुक्त करतात. केवळ त्याचे संशोधन होणे आवश्यक आहे. एकटे रामदेवबाबा काय करणार? त्यामुळे भारतीयांनी आता आयुर्वेदाकडे सर्वाधिक लक्ष देणे अपेक्षित आहे. जगात एवढी वनस्पती कोठेही नसेल तेवढी वनराई भारतात असेल. त्यामुळे पुर्वी भारतीय डॉक्टर मंडळी अपुऱ्या साधनाचा उपयोग शस्त्रक्रिया करण्यात करीत. न्हावी समाज हा डॉक्टरची भुमिका निभावत असत ते यशस्वी शस्त्रक्रिया करीत असत. त्यामुळे भारतीय आरोग्य शास्त्राला तोड नाही. ही बाब लक्षात घेतली पाहिजे. मुळात आपल्यादेशातील राज्यकर्ते यांनी जर आयुर्वेदास प्राधान्य दिले तर यात मोठे संशोधन होवू शकेल. स्वस्तात औषधी उपलब्ध होत असल्याने गोरगरीबांना परवडेल अशा किंमतीत औषधे मिळू शकतील. यात संशोधन होत नाही. ही प्राचीन आयुर्वेदाची कला लोप पावत आहे. याला राजाश्रय मिळाला पाहिजे. काही झाले तरी देशात आता मौल्यवान वनस्पतीची जपणुक केली पाहिजे. वरचेवर काँक्रेटची जंगले निर्माण होत असल्याने वनस्पती नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. वनस्पती नष्ट झाल्यातर शुद्ध ऑक्सीजन कसा मिळेल. शहरात मानसाचा दम कोंडत आहे. सर्वत्र काँक्रेटची जंगले निर्माण झाली आहेत. याला सरकारसुद्धा प्रोहत्सान देत आहे. ज्याची गरज आहे. अशाबाबीकडे दुर्लक्ष होताना दिसून येत आहे. वास्तविक प्रत्येक शाळेत व्यायामाचा तास असणे आवश्यक आहे. आत्मसंरक्षणाचे धडे आवश्यक आहेत अशा बाबीकडे शाळेतून दुर्लक्ष होताना दिसून येत आहे. आयुर्वेदिक हा विषयाची माहिती शाळेतून विद्यार्थ्यांना दिली पाहिजे. मुळात काही बाबीचा चुकीचा आवलंब होताना दिसून येत आहे. त्यामुळे भारतीय तरुण पिढी निरोगी दिसून येत नाही.कमी वयात हृदयरोगामुळे प्राण गमवावे लागत आहेत. हे योग्य नाही. सर्वात महत्वाचा व्यायाम व योगासने आहे हे प्राचीन भारतीयांचे ज्ञान आहे हे कोणत्याही परिस्थितीत लोप पावता कामा नये. याला प्रोहत्सान दिले पाहिजे. काही झाले तरी आता आयुर्वेदाची साथ घ्यावी लागेल. यात संशोधन करावे लागेल. भारतीय पिढी, जनता कशी सदृढ राहिल याचा विचार करावाच लागणार आहे. आयुष्य रोगी जगण्यापेक्षा निरोगी जगणे यातच आनंद आहे.

# भारत-युरोपियन युनियन मुक्त व्यापार करार: जागतिक व्यापाराचा 'मदर ऑफ ऑल डील्स' आणि भारताची महासत्तेकडे ऐतिहासिक भरारी



४. क्षेत्रावर आधारित परिणाम (Sector-wise Impact)

| क्षेत्र | परिणाम | फायदा |
|---|---|---|
| वस्त्रोद्योग | शून्य टॅरिफ | निर्यात वाढून लाखो रोजगार निर्मिती होईल. |
| ऑटोमोबाईल | शुल्क कपात | युरोपियन कार स्वस्त होतील, पण भारतीय बनावटीच्या पार्ट्सची निर्यात वाढेल. |
| शेती व अन्न | मानकीकरण | समुद्री उत्पादने आणि प्रक्रिया केलेल्या अन्नाला मोठी बाजारपेठ मिळेल. |
| मद्य व पेये | ९६.६% शुल्क घट | परदेशी मद्य स्वस्त होईल, ज्यामुळे हॉटेल व पर्यटन व्यवसायाला चालना मिळेल. |
| हरित ऊर्जा | ५०० दशलक्ष युरो निधी | भारताला हरित तंत्रज्ञान विकसित करण्यास आर्थिक मदत मिळेल. |

दोन दशकांच्या प्रदीर्घ वाटाघाटींनंतर भारत आणि युरोपियन युनियनमधील 'मुक्त व्यापार करार' (FTA) आता अंतिम टप्प्यात आला आहे. जगाच्या २५% जीडीपीवर प्रभाव टाकणाऱ्या या कराराला जागतिक अर्थव्यवस्थेतील 'मदर ऑफ ऑल डील्स' संबोधले जात आहे. ९०% पेक्षा जास्त उत्पादनांवरील आयात शुल्क रद्द झाल्यामुळे भारतीय कापड, चर्मोद्योग आणि आयटी क्षेत्राला युरोपची अवाढव्य बाजारपेठ खुली होणार आहे. हा करार केवळ व्यापार वृद्धीसाठी नसून, अमेरिकेच्या बदलत्या धोरणांना सक्षम पर्याय आणि चीनला जागतिक पुरवठा साखळीत दिलेला मोठा शह आहे. 'विकसित भारत २०४७' चे स्वप्न साकार करण्याच्या दिशेने हे एक क्रांतिकारी आणि धोरणात्मक पाऊल ठरेल.

जागतिक अर्थव्यवस्थेच्या पटलावर भारत आज एका अशा वळणावर उभा आहे, जिथून भविष्यातील महासत्ता बनण्याचा मार्ग प्रशस्त होत आहे. जवळपास दोन दशकांच्या (१८-१९ वर्षे) प्रदीर्घ वाटाघाटी, अनेक अडथळे आणि बदलत्या जागतिक समीकरणांनंतर, भारत आणि युरोपियन युनियन (EU) यांच्यातील मुक्त व्यापार करार (Free Trade Agreement AFTA) आता अंतिम टप्प्यात पोहोचला आहे. या कराराला केवळ एक व्यापारी करार न म्हणता चौंहशी ेष -श्रश्र ऊशरश्री असे संबोधले जात आहे. हा करार केवळ दोन अर्थव्यवस्थांना जोडणारा पूल नसून, जागतिक व्यापाराचा अक्ष भारताच्या दिशेने झुकवणारा एक ऐतिहासिक दस्तऐवज ठरणार आहे.

**१. ऐतिहासिक पार्श्र्वभूमी आणि कराराचे स्वरूप**

सन २००७ मध्ये सुरू झालेली ही चर्चेची प्रक्रिया विविध कारणांमुळे प्रलंबित राहिली होती. मात्र, पंतप्रधान नरेंद्र मोदी, परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर आणि वाणिज्य मंत्री पीयूष गोयल यांच्या धोरणात्मक चातुर्यामुळे आज हा करार प्रत्यक्षात येत आहे. युरोपियन युनियनमध्ये २७ देशांचा समावेश असून, या करारामुळे भारताला अमेरिकेच्या बाजारपेठेपेक्षा दुप्पट मोठ्या असलेल्या युरोपियन बाजारपेठेचे दरवाजे खुले होणार आहेत.

हा करार अत्यंत व्यापक आहे, कारण यात केवळ वस्तूंचा (Goods) व्यापार नाही, तर सेवा (Services), गुंतवणूक (Investment), तंत्रज्ञान हस्तांतरण आणि बौद्धिक संपदा अधिकार यांसारख्या अनेक पैलूंचा समावेश आहे.

**२. कराराची मुख्य वैशिष्ट्ये: काय बदलणार?**

या कराराचा मुख्य आधार 'टॅरिफ' (आयात शुल्क) मधील कपात हा आहे.

९०% पेक्षा जास्त मालावरील शुल्क रद्द: या करारानुसार, दोन्ही बाजूंनी एकमेकांच्या ९० टक्क्यांहून अधिक उत्पादनांवरील आयात शुल्क टप्प्याटप्प्याने कमी किंवा पूर्णपणे रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे.

युरोपियन वस्तूंचा प्रवेश: युरोपमधून येणाऱ्या हाय-एंड कार, वाईन, बिअर, यंत्रसामग्री आणि प्रगत वैद्यकीय उपकरणे यांच्यावरील शुल्क कमी होईल. यामुळे भारतीय ग्राहकांना जागतिक दर्जाची उत्पादने स्वस्त दरात उपलब्ध होतील.

भारतीय उत्पादनांना 'रेड कार्पेट': भारतीय वस्त्रोद्योग (Textiles), चर्मोद्योग, रत्ने-दागिने, रसायने आणि अभियांत्रिकी वस्तूंना युरोपमध्ये कोणताही अडथळा न येता प्रवेश मिळेल.

**३. आर्थिक विश्र्लेषण: सकारात्मक पैलू आणि संधी**

**निर्यातदारांसाठी सुवर्णकाळ**

भारतीय कापड उद्योग आणि दागिने उद्योगासाठी हा करार 'बूस्टर डोस' ठरेल. सध्या बांगलादेश आणि व्हिएतनामसारख्या देशांना युरोपमध्ये जो फायदा मिळतो, तोच आता भारताला मिळेल. यामुळे आपली निर्यात कित्येक अब्ज डॉलर्सनी वाढण्याची शक्यता आहे.

**इ) गुंतवणूक आणि 'Make in India' ला गती**

युरोपियन कंपन्या भारतात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक (FDI) करतील. विशेषतः जर्मनी आणि फ्रान्समधील उच्च तंत्रज्ञान भारतात येईल. यामुळे भारतातील मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्राला मोठी उभारी मिळेल. जेव्हा जागतिक पुरवठा साखळी (Global Supply Chain) चीनकडून भारताकडे सरकत आहे, अशा वेळी हा करार भारताची भूमिका अधिक मजबूत करेल.

उ) तंत्रज्ञान आणि सेवा क्षेत्र

भारतीय आयटी (IT) क्षेत्रातील व्यावसायिकांना युरोपमध्ये काम करण्यासाठी सुलभ व्हिसा प्रक्रिया आणि सेवा निर्यातीसाठी मोठ्या संधी उपलब्ध होतील.

हरित ऊर्जा

५०० दशलक्ष युरो निधी

भारताला हरित तंत्रज्ञान विकसित करण्यास आर्थिक मदत मिळेल.

५. राजकीय आणि धोरणात्मक महत्त्व (Strategic Analysis)

हा करार केवळ व्यापार वृद्धीसाठी नाही, तर तो एक रणनीतिक विजय आहे.

**पर्यायी बाजारपेठ:** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी भविष्यात कितीही कडक टॅरिफ (उदा. ५००%) लावले, तरी भारताकडे आता युरोपसारखा प्रचंड मोठा पर्याय उपलब्ध असेल. यामुळे भारताची व्यापारिक स्वायत्तता टिकून राहील.

जागतिक प्रतिमा: रशिया-युक्रेन युद्ध आणि मध्यपूर्वेतील तणावाच्या काळात भारताने युरोपशी केलेला हा करार भारताची 'विश्र्वासार्ह व्यापार भागीदार' ही प्रतिमा उंचावणारा आहे.

**चीनला शह:** युरोपियन देश आता चीनवरील आपले अवलंबित्व कमी करू इच्छित आहेत. भारत हा त्यांच्यासाठी सर्वात सक्षम लोकशाही पर्याय ठरत आहे.

**६. आव्हाने आणि चिंतेच्या बाबी**

प्रत्येक मोठ्या करारात काही जोखीम असते, तशीच इथेही आहे:

लघुउद्योगांवरील (MSME) परिणाम: युरोपमधून येणाऱ्या स्वस्त आणि दर्जेदार मशिनरीमुळे भारतातील काही स्थानिक लघुउद्योगांना स्पर्धेचा सामना करावा लागू शकतो.

कठोर मानके (Standards): युरोपियन युनियनचे पर्यावरणीय आणि गुणवत्तेचे निकष अत्यंत कडक असतात. भारतीय उत्पादकांना आपली गुणवत्ता त्या स्तरावर न्यावी लागेल, ज्यासाठी सुरुवातीला खर्च वाढू शकतो.

व्यापार तूट: जर युरोपमधून आयात होणाऱ्या वस्तूंचे प्रमाण निर्यातीपेक्षा जास्त झाले, तर व्यापार तूट वाढण्याची भीती आहे.

७. पर्यावरण **आणि 'ग्रीन' सहकार्य**

युरोपियन युनियनने भारताला ए५०० दशलक्ष (सुमारे ४५०० कोटी रुपये) पर्यावरण सहाय्य निधी देण्याचा प्रस्ताव दिला आहे. हे अतिशय महत्त्वाचे आहे, कारण यामुळे भारताला आपल्या 'नेट झिरो' उद्दिष्टाकडे वेगाने जाता येईल. हरित तंत्रज्ञान, सौर ऊर्जा आणि इलेक्ट्रिक वाहने या क्षेत्रात युरोपचा अनुभव भारतासाठी दिशादर्शक ठरेल.

८. 'Mother of All Deals' का?

या कराराला हे नाव मिळण्यामागे तीन प्रमुख कारणे आहेत:

**व्याप्ती:** हा करार २ अब्ज लोकांच्या बाजारपेठेवर परिणाम करतो.

**आर्थिक वजन:** हा करार जगाच्या सुमारे २५% जीडीपीला थेट प्रभावित करतो.

**दीर्घकालीन परिणाम:** हा केवळ ५-१० वर्षांचा करार नसून, पुढील ५० वर्षांच्या भारत-युरोप संबंधांची ही पायाभरणी आहे.

**९. भारतीय अर्थव्यवस्थेवरील सामाजिक परिणाम**

या कराराचा सर्वात मोठा परिणाम रोजगार निर्मितीवर होईल. जेव्हा कापड, अभियांत्रिकी आणि सेवा क्षेत्र विस्तारते, तेव्हा ग्रामीण आणि निमशहरी भागातील तरुणांना रोजगाराच्या संधी मिळतात. तसेच, प्रगत वैद्यकीय उपकरणे स्वस्त झाल्यामुळे भारतातील आरोग्य व्यवस्था अधिक परवडणारी होऊ शकते.

**१०. भविष्याची दिशा**

भारत-एण मुक्त व्यापार करार हा २१ व्या शतकातील भारताच्या आर्थिक मुत्सद्देगिरीचा सर्वोच्च बिंदू आहे. २९ देशांच्या या समूहाशी व्यापार करणे म्हणजे भारताच्या प्रगतीला 'ग्लोबल इंजिन' जोडण्यासारखे आहे.

सध्या वाटाघाटी पूर्ण झाल्या असून कायदेशीर प्रक्रियेनंतर काही महिन्यांत हा करार पूर्णपणे लागू होईल. हा करार म्हणजे 'विकसित भारत २०४७' च्या दिशेने टाकलेले सर्वात मोठे पाऊल आहे. भारताची अंतराळ संशोधनातील प्रगती (आकाश आणि पिनाका क्षेपणास्त्रे) आता युरोपियन अवकाशात आणि बाजारपेठेत आपले स्थान निर्माण करतील, हे निश्र्चित.

मोदी सरकारचे धोरण, जयशंकर यांची मुत्सद्देगिरी आणि पीयूष गोयल यांचे व्यापारी कौशल्य यांनी मिळून भारताला जागतिक व्यापाराचा 'शहेनशहा' बनवण्याच्या दिशेने हा ऐतिहासिक करार घडवून आणला आहे. भारतासाठी हे केवळ एक 'डील' नसून, जागतिक पटलावर आपले अस्तित्व सिद्ध करण्याची एक सुवर्णसंधी आहे.



लेखक –
राहुल हरिभाऊ इंगळे पाटील
मोबाईल – ९८९०५७७१२८

# लिव्हर निरोगी ठेवण्यासाठी फायदेशीर आहेत 'हे' ड्रायफ्रूट्स, रोज करा सेवन

आजकाल बहुतांश लोक निरोगी राहण्यासाठी ड्रायफ्रुट्सचे सेवन करतात. ड्रायफ्रूट्स खाणे आरोग्यासाठी प्रचंड फायदेशीर मानले जाते. त्यांचे सेवन केल्याने शरीराचे पोषण होते आणि आरोग्य चांगले राहते. ड्रायफ्रूट्स हृदय, यकृत निरोगी ठेवण्यास आणि ऊर्जा प्रदान करण्यास देखील मदत करतात.

त्यामुळेच शरीराच्या सर्वात महत्वाच्या अवयवांपैकी एक असलेल्या लिव्हरला निरोगी ठेवण्यासाठीसुद्धा ड्रायफ्रूट्स खाण्याचा सल्ला दिला जातो. परंतु लिव्हरच्या आरोग्यासाठी कोणते ड्रायफ्रूट्स जास्त फायदेशीर आहेत हे अनेकांना माहिती नसते. आज आपण त्याबाबतच जाणून घेऊया

**अंजीर**

अंजीरमध्ये भरपूर प्रमाणात फायबर आणि अँटीऑक्सिडंट्स असतात. जे यकृत म्हणेजच लिव्हरच्या आरोग्यासाठी फायदेशीर असतात. त्यात अनेक एंजाइम असतात जे विषारी पदार्थ बाहेर काढण्यास, यकृताचे कार्य सुधारण्यास आणि नुकसान टाळण्यास मदत करतात. शिवाय, ते पचन सुधारण्यास देखील मदत करतात. अंजीर भिजवून खाणे आरोग्यासाठी जास्त फायदेशीर आहे.

**खजूर**

खजूर आरोग्यासाठी फायदेशीर आहेत. त्यामध्ये फायबर, लोह आणि पोटॅशियमसह अनेक पोषक तत्वे समृद्ध आहेत. त्यांचे सेवन केल्याने शरीर डिटॉक्स होण्यास आणि पचन सुधारण्यास मदत होते. ते यकृताचे कार्य सुधारण्यास आणि यकृत निरोगी राखण्यास मदत करते.

**बदाम**

बदाम यकृतासाठी फायदेशीर आहेत. त्यात निरोगी फॅट्स , व्हिटॅमिन ई आणि अँटीऑक्सिडंट्स चांगल्या प्रमाणात असतात. त्यांचे सेवन केल्याने यकृताचे कार्य सुधारू शकते आणि चरबी जमा होण्यास प्रतिबंध होऊ शकतो.ज्यामुळे फॅटी लिव्हरच्या समस्या दूर होण्यास आणि निरोगी राहण्यास मदत होते.

**अक्रोड**

अक्रोडमध्ये ओमेगा-३ फॅटी ॲसिड सारख्या पोषक तत्वांचा समावेश असतो. तसेच त्यात अँटी इन्फ्लीमेंट्री आणि अँटीऑक्सिडंट्स गुणधर्म असतात. म्हणून, अक्रोड खाल्ल्याने यकृताच्या पेशींचे संरक्षण करण्यास, यकृताचे कार्य सुधारण्यास आणि जळजळ कमी करण्यास मदत होते.

## शरीरात व्हिटॅमिन डीची कमतरता आहे हे कसे ओळखावे

शरीरात कोणत्याही जीवनसत्त्वाच्या कमतरतेमुळे अनेक समस्या उद्भवू शकतात. आजकाल व्हिटॅमिन डीची कमतरता ही एक सामान्य गोष्ट झाली आहे. त्याच्या कमतरतेमुळे रोगप्रतिकारक शक्तीवर तसेच हाडांच्या कमकुवततेवर परिणाम होतो. व्हिटॅमिन डीमुळे शरीरातील ऑस्टिओपोरोसिस आणि रिकेट्स सारख्या आजारांचा धोकाही कमी होतो. व्हिटॅमिन डीचे पुरेसे प्रमाण सर्दी, खोकला आणि फ्लू यांसारख्या आजारांपासूनही संरक्षण करते. व्हिटॅमिन डी देखील स्नायूंची ताकद वाढवण्याचे काम करते.

आपल्या शरीराला ही जीवनसत्त्वे सूर्यकिरणांपासून मिळतात. अन्नाबद्दल बोलायचे झाले तर टूना फिश, अंड्यातील पिवळ बलक आणि मशरूममध्येही व्हिटॅमिन डीचे प्रमाण चांगले असते. पण सूर्यप्रकाश न घेतल्याने आणि आहाराची काळजी न घेतल्याने शरीरात व्हिटॅमिन डीची कमतरता सुरू होते. त्याच्या कमतरतेची लक्षणे शरीरातही दिसू लागतात, परंतु लोकांना त्याबद्दल माहिती नसते. अशा परिस्थितीत व्हिटॅमिन डीची कमतरता कशी ओळखली जाते, हे जाणून घेणे तुमच्यासाठी महत्त्वाचे आहे.

व्हिटॅमिन डीच्या कमतरतेमुळे शरीर थकलेले राहते. ऊर्जेची पातळी घसरू लागते. हाडे आणि स्नायूंमध्ये वेदना सुरू होतात आणि ही समस्या वाढतच जाते. व्हिटॅमिन डीच्या कमतरतेमुळे तुमच्या मेंदूच्या आरोग्यावरही परिणाम होऊ शकतो. यामुळे मूड स्विंग, दुःख आणि नैराश्य यासारख्या समस्या उद्भवू शकतात.

व्हिटॅमिन डी देखील न्यूरोट्रांसमीटरशी संबंधित आहे. हे न्यूरोट्रांसमीटर मेंदूतील भावनांवर नियंत्रण ठेवण्याचे काम करतात. जेव्हा व्हिटॅमिन डीचे प्रमाण पुरेसे नसते तेव्हा या न्यूरोट्रांसमीटरच्या कार्यावर परिणाम होऊ लागतो. यामुळे मानसिक तणावाशी संबंधित समस्या उद्भवू शकतात. दीर्घकाळ उदास राहिल्याने नैराश्य आणि डोकेदुखी होऊ शकते.

कसे करावे संरक्षण

दररोज १५-२० मिनिटे सूर्यप्रकाशात घालवा

मासे, अंड्यातील पिवळ बलक आणि मशरूम खा

दूध आणि दुग्धजन्य पदार्थांचे सेवन करा

तुमच्या डॉक्टरांच्या निर्देशानुसार व्हिटॅमिन डी सप्लिमेंट्स घ्या

आरोग्य तपासणी करून घ्या म्हणजे त्याची कमतरता योग्य वेळी ओळखता येईल.

## चेहरा फारच तेलकट आणि निस्तेज दिसतोय? 'हे' घरगुती फेस पॅक देतील चमकदार त्वचा

घरगुती फेस पॅकमुळे त्वचेमध्ये कोलेजनचे उत्पादन वाढते आणि त्वचेची चमक वाढते.

अनेक लोकांना तेलकट त्वचेमुळे त्रास होत असतो. त्यामुळे ते अनेक महागडी उत्पादने वापरत असतात. पण तेलकट त्वचेवर अशी उत्पादने लावावीत जी केवळ त्वचेतील तेल कमी करत नाहीत तर तिला पोषण देखील देतात. तेलकट त्वचेपासून आराम मिळवण्यासाठी बाजारात अनेक उत्पादने उपलब्ध आहेत. ही उत्पादने महाग असतात आणि बहुतेकदा त्वचेला सहन होत नाहीत.

अशात तेलकट त्वचेच्या समस्या दूर करण्यासाठी, काही घरगुती घटकांपासून भोपळ्याचा फेस पॅक बनवता येतो. हा पॅक फक्त त्वचेला हायड्रेटडच ठेवणार नाही तर तेलकटपणाची समस्या देखील दूर करेल. भोपळ्यामुळे त्वचेमध्ये कोलेजनचे उत्पादन वाढते आणि त्वचेची चमक वाढते. तसेच चेहऱ्यावर लावल्याने त्वचेची लवचिकता वाढते आणि त्वचा घट्ट होते.चला पाहूया फेस पॅक नेमके कसे बनवायचे आणि कसे वापरायचे

**ओटमील**

भोपळा आणि ओटमीलचा फेस पॅक बनवण्यासाठी, भोपळ्याची प्युरी, मध आणि ओटमील असे सर्व घटक एकत्र करून पेस्ट तयार करा. ही पेस्ट तुमच्या चेहऱ्यावर लावा, हलक्या हाताने चोळा. २० मिनिटे तसेच राहू द्या. नंतर, तुमचा चेहरा पाण्याने धुवा. या पॅकमुळे ब्लॅकहेड्स कमी होतात आणि तेल कमी होते.

**दही**

भोपळा आणि दह्याचा फेस पॅक बनवण्यासाठी, दही, भोपळ्याची प्युरी आणि मध असे घटक एकत्र करून पेस्ट तयार करा. ही पेस्ट तुमच्या चेहऱ्यावर आणि मानेवर २० मिनिटे लावा. नंतर, तुमचा चेहरा पाण्याने धुवा. या पॅकमुळे त्वचेतील जास्तीचे तेल कमी होते आणि तुमची त्वचा चमकदार राहते.

**लिंबू**

हा फेस पॅक बनवण्यासाठी भोपळ्याची प्युरी, लिंबाच्या रस आणि व्हिटॅमिन ई ची एक कॅप्सूल एकत्र करून घट्ट पेस्ट तयार करा. ही पेस्ट तुमच्या चेहऱ्यावर आणि मानेवर १५ मिनिटे लावा. नंतर, तुमचा चेहरा पाण्याने धुवा. हा पॅक तुमची त्वचा घट्ट करेल आणि तेलकट त्वचेपासून आराम देईल.

## मुलांच्या मानसिक आणि शारीरिक विकासावर परिणाम करतात 'हे' पदार्थ, खाणे टाळा

प्रत्येक पालकाला आपले मुल शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या निरोगी असावे असे वाटते.पण आजची मुले बाहेरील जंकफूड खाण्याला प्राधान्य देतात. ज्यामुळे लहान वयातच विविध आजार होण्याचा धोका वाढतो. धावपळीच्या जीवनशैली आणि बदलेल्या कामाच्या पद्धतींमुळे, पालकांना त्यांच्या मुलांच्या आरोग्यावर लक्ष केंद्रित करण्यासाठी अनेकदा वेळ नसतो.

परिणामी, पालक अनेकदा घाईघाईने बाहेरून विविध प्रकारचे पदार्थ खरेदी करतात. हे पदार्थ फक्त मुलांच्या आरोग्यालाच हानी पोहोचवत नाहीत तर त्यांच्या वाढीवरही परिणाम करतात. मुलांना निरोगी ठेवण्यासाठी, त्यांच्या आहारात हिरव्या भाज्या, हंगामी फळे समाविष्ट करा. आज आपण मुलांना कोणते पदार्थ खायला देणे टाळावे याबाबत जाणून घेऊया

**खारट पदार्थ–**

बाजारात मिळणाऱ्या अनेक स्नॅक्समध्ये मीठ मोठ्या प्रमाणात असते. हे पदार्थ मुलांना चविष्ट वाटू शकतात, परंतु त्यांच्या नियमित सेवनामुळे उच्च रक्तदाब, मधुमेह आणि लठ्ठपणाचा धोका लक्षणीयरीत्या वाढतो. मुलांना बाजारात मिळणारे चिप्स आणि स्नॅक्स देणे टाळणे महत्वाचे आहे.

**गोड पदार्थ–**

आजकाल मुले बिस्कीट, चॉकलेट आणि मिठाई जास्त खातात. हे पदार्थ शरीरासाठी हानिकारक आहेत आणि मुलांचे वजनदेखील वेगाने वाढवतात. हे पदार्थ खाल्ल्याने मुले जास्त खातात, ज्यामुळे पोटदुखी आणि पचनक्रिया बिघडू शकते.

**फास्ट फूड–**

आजकाल मोठ्यांसोबत मुलेसुद्धा बर्गर, पिझ्झा, फ्रेंच फ्राईज आणि प्रक्रिया केलेले पदार्थ जास्त खातात. यामुळे लहान वयातच लठ्ठपणा, मधुमेह आणि थकवा येऊ शकतो. या पदार्थांमुळे मुलांमध्ये जास्त खाण्याची प्रवृत्ती वाढते, ज्यामुळे वजन जलद वाढते.


**प्रक्रिया केलेले पदार्थ–**

प्रक्रिया केलेले पदार्थ खाणे मुलांसाठी हानिकारक असू शकते. प्रक्रिया केलेले पदार्थ खाल्ल्याने मुलांच्या वाढीवर आणि मानसिक आरोग्यावर परिणाम होऊ शकतो. मुलांना कधीही प्रक्रिया केलेले पदार्थ देऊ नयेत. त्यांना पेस्ट्री, चिप्स, स्नॅक्स आणि बिस्किटे दररोज देणे टाळा.

**कोल्डड्रिंक्स–**

बहुतेक उपलब्ध असलेल्या कोल्डड्रिंक्समध्ये गोड करण्यासाठी जास्त प्रमाणात साखर घातलेली असते. जी शरीरासाठी हानिकारक असण्यासोबतच मुलांमध्ये दात किडण्यास कारणीभूत ठरू शकते आणि मधुमेह आणि लठ्ठपणाचा धोका वाढवू शकते.

# प्रजा जागृत व्हावी



समता, समानता, समाजवाद ही तत्त्वे घटनेमध्ये आहेत. 'ती घटनाच नको' असा विचार पसरवला जात आहे. या बहुसंख्याक वादाला विरोध करण्यासाठी देशाच्या प्रजेने जागृत होणे आवश्यक आहे.

आज सर्व देश 'प्रजासत्ताक दिन' आनंदाने साजरा करत आहे. परकीय सत्तेच्या जोखडातून देश मुक्त झाला तरी या देशाचा कारभार कोणत्या तत्त्वानुसार चालवायचा यावर तत्कालीन धुरिणांनी बरेच वैचारिक मंथन केले व 'लोकशाही' आणि 'प्रजासत्ताक' या तत्त्वांचा स्वीकार केला. त्यासाठी देशाने राज्यघटना तयार केली व स्वीकारली. ही घटना सर्वसंमत करण्याचा आणि प्रजेची सत्ता मान्य करण्याच्या विचाराचा हा वर्धापनदिन आहे. यावेळी देशाचे स्वातंत्र्य व स्वराज्य यासाठी आपले आयुष्य वेचणारे देशातील पहिले लोकप्रिय नेते लोकमान्य टिळक यांचे स्मरण होणे अपरिहार्य आहे. त्यांना 'भारतीय असंतोषाचे जनक' म्हटले जाते. कारण त्यांनी भारतीय जनतेत इंग्रजी राजवटीबद्दल असंतोष निर्माण केला; मात्र तेवढ्यावरच ते थांबले नाहीत. या देशाचा कारभार येथील जनतेने म्हणजेच 'प्रजेने' चाल-वावा हे लोकशाहीचे मूलतत्त्वही त्यांनी मांडले. 'स्वराज्य' या संकल्पनेचा अर्थ लोकमान्यांनी सोप्या शब्दांत विषद केला. 'आमच्या घराचा कारभार कसा करावयाचा ते आम्हाला ठरवण्याचा अधिकार म्हणजे स्वराज्य' असे त्यांनी म्हटले आहे. त्याद्वारे त्यांनी 'लोकशाही' आणि 'प्रजासत्ताक' ही तत्त्वेही अधोरेखित केली. या संकल्पना भारतासाठी नवीन असलेल्या काळात लोकमान्यांनी प्रजेच्या सत्तेचा पाठपुरावा केला होता.

बहुमताचे महत्त्व


लोकमान्य काळाच्या पुढे पाहाणारे होते म्हणूनच त्यांना 'द्रष्टे' म्हटले जाते. इंग्रजांची सत्ता कधीच जाऊ शकणार नाही असा विचार जनतेत पसरला असताना, त्या सत्तेला आव्हान देण्याचे बळ लोकमान्यांनी सामान्य माणसाला दिले. १९२० मध्ये एका अग्रलेखातून त्यांनी आपली लोकशाहीबद्दलची मते मांडली होती. 'राष्ट्रीय सभे'च्या (काँग्रेस) ठरावाचा आधार त्यास आहे. शेती व कारखान्यांतील मजुरांना त्यांच्या श्रमाचा न्याय्य मोबदला मिळावा, मुले व मुली यांना मोफत व सक्तीचे शिक्षण द्यावे असे मत व्यक्त करताना 'खर्या विकासा'चा मुद्दा लोकमान्यांनी त्यात मांडला आहे. समता, बंधुभाव व जातिभेद निर्मूलन यांचा पुरस्कार त्यांनी केला होता. देशाचा कारभार चालवण्याबाबत त्यांनी किती बारकाईने विचार केला होता हे त्यातून दिसते. त्याही पूर्वी त्यांनी 'बहुमताचा स्वीकार' या विचाराला पाठिंबा दिला होता. सभागृहातील सदस्यांचे संख्याबळ असा बहुमताचा अर्थ त्यांना अभिप्रेत नव्हता तर 'बहुसंख्य जनतेचे' मत असे त्यांना मांडायचे होते. सर्व जाती-धर्म, पंथ, स्त्री-पुरुष, वंचित गट यांचा समावेश असलेले 'बहुमत' त्यांना अपेक्षित होते. याचा अर्थ 'बहुसंख्याकवाद' त्यांना अमान्य होता. भारताला स्वातंत्र्य अजून मिळालेले नव्ह-ते, भारतीयांचे लोकप्रतिनिधी ही कल्पना अजून जनतेला समजलेली नव्हती आणि पचनी तर पडलीच नव्हती. सत्ताधार्यांनी लोकमताची कदर केली पाहिजे हे त्यांनी ठणकावून सांगितले होते. 'जेथे कायदे दंडेलीच्या किंवा मनगटाच्या जोरावर पास होतात, तेथे लोकपक्षाचे मुद्दे खोडण्याऐवजी लोकमताची पायमल्ली व लोकनियुक्त सभासदांचा व त्यांच्या भाषणांचा निव्वळ उपहास व तिरस्कार व्हावयाचा' असे लोकमान्यांनी १९०५ मध्ये म्हटले होते. विरोधकांना न जुमानता, चर्चा न करता विधेयके संमत केली जातात हे देशाने गेल्या दशकभरात वारंवार पाहिले आहे. 'बहुसंख्याकवादा'च्या बळावर जनतेचे 'बहुमत' कसे डावलले जाते त्याचेच हे उदाहरण आहे. हे बघता देशात खरेच प्रजेची सत्ता आहे का? असा प्रश्न पडतो. 'कायदे कौन्सिलात लोकपक्षीय सभासदांचे वर्चस्व पाहिजे व कायदे कौन्सिलाचा कार्यकारी मंडळावर दाब पाहिजे' असे प्रतिपादन करताना लोकमान्यांनी न्याय संस्था व सरकार यांच्या संबंधाविषयीही मत व्यक्त केले होते. 'बुलडोझर न्याय' असो किंवा 'मतदार याद्यांची पडताळणी' असो आजही सामान्यांना न्याय संस्थेचा आधार वाटतो ते का? 'बटेंगे तो कटेंगे' अशी घोषणा देऊन धर्म व जातींमध्ये फूट पाडली जात आहे हे जनतेने ओळखले पाहिजे. कथित विकासाच्या प्रचाराला बळी न पडता आपल्या हक्कांविषयी जनता जागृत झाली, तर 'प्रजासत्ताक दिन' खर्या अर्थाने साजरा होईल.

# वासुदेव चाफेकर



वासुदेव चाफेकरांचा जन्म १८८० मध्ये कोकणात चित्पावन ब्राह्मण कुटुंबात झाला. त्यांनी मराठी भाषेमधून शिक्षण घेतले. राजकारणात आणि क्रांतिकारी कारवायांमध्ये दामोदर चाफेकर आणि बाळकृष्ण चाफेकर या त्यांच्या बंधुंसह सहभाग घेतला. भारतीय तरुणांना शस्त्रांचे प्रशिक्षण दिले. रँडच्या पुण्यातील वाईट वागणुकीबद्दल त्याच्या वधाचा कट रचला. त्यांना अटक करून खटला चालविण्यात आला. अखेर येरवडा तुरूंगात फाशी देण्यात आली. चाफेकरांचे वडील हरिपंत, पुणे व मुंबईत हरिकथा सांगायचे. त्यांमुळे चाफेकर बंधूंच्या शिक्षणात खंड पडला. बालवयात तिघेही भाऊ हरि कीर्तनात वडिलांना मदत करायचे. पुण्यातील राजकीय घडामोडींनी प्रेरीत होऊन चळवळीकडे वळले. ब्रिटिशांनी आणलेल्या संमती वयाच्या विधेयकास त्यांचा तीव्र विरोध होता. भारतीय संस्कृतीत हस्तक्षेप करणा-या ब्रिटीशांबिरूद्ध टिळकांनी केसरीमधून घणाघाती प्रहार करायला सुरूवात केली होती. या आवाहनाने तीनही भाऊ प्रेरित झाले. त्यांनी लोकसंघटन केले. याचवेळी पुण्यात प्लेगच्या साथीने अक्राळविक्राळ स्वरूप धारण केल्याने ब्रिटिशांनी वॉल्टर चार्ल्स रँडला भारतात पाचारण केले. रँडचे प्लेग रोग निवारण करण्याच्या नावाने अत्याचाराचे सत्र सुरु झाले. रँडने सामाजिक पायदंड पायदळी तुडवून लोकांचा असंतोष ओढवून घेतला. यामुळे चाफेकर बंधूच्या मनात ब्रिटिशाविरुद्ध तिरस्कार निर्माण झाला. या सा-याचा सूड घेण्याची योजना त्यांनी तायर केली. त्यावेळी व्हिक्टोरिया राणीच्या राज्यारोहणाचा हिरकमहोत्सव साजरा करण्यात येत होता. सगळीकडे रोषणाई करण्यात आली होती. तसेच मेजवानी चे आयोजन करण्यात आले होते. दामोदर चाफेकर या तरुणाने गाडी काढली व गणेश खिंड येथे वाट पाहत २२ जून १८९७ सालच्या मध्यरात्री निवास्थानातून बाहेर पडलेल्या रँड ह्याचेवर जवळून गोळ्या झाडल्या. रॅंड हा काही काळ कोमात राहिला व कालांतराने ३ जुलै १८९७ रोजी मरण पावला. याचवेळेस दामोदराच्या भाऊ बाळकृष्णाने रँड सोबत बसलेल्या लेफ्टनंट आयरीस्टवर गोळ्या झाडल्या. चाफेकर बंधू निसटण्यास यशस्वी झाले तरी नंतर तिघाही भावांना पकडण्यात आले. दामोदराला मुंबईत अटक झाली व १८ एप्रिल १८९८ रोजी त्यास फासावर चढवण्यात आले. त्यापाठोपाठ वासुदेवाला ८ मे १८९९ व बाळकृष्णाला १६ मे १८९९ रोजी फासावर चढवण्यात आले. चाफेकर बंधू देशाकरीता शहीद झाले.

# किडनी निकामी होण्याची मुख्य लक्षणे



किडनी निकामी होण्याची मुख्य लक्षणे म्हणजे पायांवर/घोट्याला सूज येणे, लघवीचे प्रमाण खूप कमी किंवा जास्त होणे, सतत थकवा जाणवणे, श्वास घेण्यास त्रास होणे आणि त्वचेला खाज सुटणे ही आहेत . याव्यतिरिक्त मळमळ, उलट्या, भूक न लागणे आणि झोपेच्या समस्या देखील उद्भवू शकतात

**किडनी खराब होण्याची प्रमुख लक्षणे**

**लघवीमध्ये बदल:** लघवीच्या रंगात बदल होणे (गडद किंवा फेसाळ), लघवीचे प्रमाण अचानक खूप कमी होणे किंवा रात्रभर वारंवार लघवीला होणे **शरीरावर सूज:** किडनी शरीरातील अतिरिक्त पाणी बाहेर टाकू शकत नाही, ज्यामुळे पाय, घोटा, हात किंवा चेहऱ्यावर (विशेषतः डोळ्यांच्या खाली) सूज येते

**अति थकवा आणि अशक्तपणा:** शरीरात रक्ताची कमतरता (ॲनिमिया) झाल्यामुळे सतत थकवा आणि सुस्ती जाणवते

**त्वचेवर खाज:** रक्तातील टाकाऊ पदार्थ (युरिया/क्रिएटिनिन) जमा झाल्यामुळे त्वचेला तीव्र खाज सुटू शकते १, ६.

**श्वास घेण्यास त्रास:** फुफ्फुसात पाणी जमा झाल्यामुळे किंवा रक्ताच्या कमतरतेमुळे श्वास घेण्यास अडचण येते. भूक न लागणे व मळमळ: उलट्या, मळमळ आणि अन्नाची चव बदलणे, भूक न लागणे ही लक्षणे दिसतात. उच्च रक्तदाब: किडनी निकामी झाल्यामुळे अच-ानक बीपी वाढू शकतो झोपेचा त्रास: झोप न येणे, रात्री अस्वस्थ वाटणे **महत्त्वाची टीप:** जर अशी लक्षणे सतत जाणवत असतील, तर त्वरित नेफ्रोलॉजिस्टचा (किडनी तज्ञ) सल्ला घेऊन रक्त आणि लघवीची चाचणी करणे आवश्यक आहे

# आदर्श



मग काय म्हणताय माझ्या बालमित्रांनो संपली का परिक्षा? सुट्टी लागली असेल आणि सुट्टीत काय काय करायचे कुठे कुठे जायचे याचे वेळापत्रकही तयार झाले असेल. कुणी सुट्टीला मामाकडे जाणार असेल तर कुणी आई बाबांबरोबर सहलीला, कुणी वेगवेगळया शिबीरात भाग घेणार असेल तर कुणी पोहण्याचा क्लास लावला असेल. दिवसभर नुसती धमाल करत असाल नाही? आणि खरं सांगू का अशी धमाल तर करायलाच हवी सुट्टी. कारण वर्षभर तुम्ही शाळा, शिकवणी, अभ्यास आणि परिक्षा या सर्वांमध्ये इतके गुंतलेले असता की धमाल करु म्हटले तरी वेळ नसतो.

बालमित्रांनो आजपर्यंत तुम्ही आजी आजोबांकडून किंवा पुस्तकांतून बर्याच गोष्टी ऐकल्या व वाचल्या असतील आणि त्यातून काही शिकलाही असाल. तुम्ही तुमच्या अवतीभवती किंवा बागेत अनेक प्राणी, पक्षी आणि अजूनही खुप काही गोष्टी पाहता, पण त्या गोष्टीमधील महत्वाची वैशिष्टे घेण्याचा तुम्ही कधी प्रयत्न केलाय का? तुम्ही आता या सुट्टीत मागच्या सुट्टीपेक्षा एक वर्षाने मोठे झालात आणि हेच पुढच्या सुट्टीत पण होणार मग मोठे झालात तरीपण छोटेपणातले धडे विसरायचे नाही हं!

डीूरआता हेच पहा तुम्ही सुर्य रोज पाहता पण याचा कधी विचार केला का की सुर्य ज्याप्रमाणे तेजस्वी राहून सर्वांना प्रकाश देतो तसेच मी पण तेजस्वी बणण्याचा प्रयत्न करील.

क्रींळतुम्ही हत्तीदादाला पाहता. त्याचे ते भले मोठे शरीर, सुपाएवढे कान आणि लांब अशी सोंड हे सर्व पाहता पण कधी त्याच्या इवल्याश्या डोळयातील तीक्ष्ण नजरेचा विचार केलाय का? तेव्हा मित्रांनो आपल्याला ह्या छोटयाश्या पण तीक्ष्ण अशा हत्तीदादाच्या दृष्टीचा आदर्श घ्यायचाय.

डळपहरजंगलचा राजा सिंह. त्याचा तो रुबाब, एक डरकाळी फोडली तर जंगल हादरुन जाईन. त्याच्याकडून आपल्याला काय घेता येईल बरे? तर आपल्यामध्ये मोठी ताकद येण्यासाठी सिंहाच्या शरीरयष्टीचा आदर्श घ्यायचा.

त्र्हेवरअतिशय चपळ असा प्राणी म्हणजे घोडा. तुम्हाला काय वाटते याच्याकडे पाह्यल्यावर? याच्याकडून आपल्याला शिकता येणारी गोष्ट म्हणजे मोठी धाव घेण्यासाठी लागण-ारी बळकट टाप. मग घेणार ना ह्या बळकट टापेचा आदर्श धावायला?

त्र्ीींवआकाराने मोठा असून सुध्दा आकाशात उंच उंच भरारी मारणारा पक्षी म्हणजे गरुड. आपल्याला यशस्वी व्हायचे असेल तर गरुडाचा आदर्श घेऊन त्याच्याकडून गगनभरारी घेण्यासाठी लागणारी झेप घ्यावी.


चीींपसळमुंगी ही अतिशय छोटा प्राणी. साखरेचा एक दाणा मिळवण्यासाठी ती किती धडपड करते, किती अथक परिश्रम करते. मग साखर म्हणजे हवे ते मिळवायचे असेल तर मुंगीचा आदर्श घ्यायला काय बिघडते?

घहरीअसे म्हणतात राम रावण युध्दाच्यावेळी पुल बांधण्यासाठी खारुताईने छोटे छोटे खडे गोळा केले आणि तिच्या या कामाबद्दल रामाने तिच्या पाठीवरुन हात फिरवून शाबासकी दिली. त्याची खूण म्हणजे खारुताईच्या पाठीवर असलेल्या पाच रेषा ज्या रामाच्या बोटांनी उठल्या असे म्हणतात. मग चांगले काम करुन सर्वांना मदत करुन खारुताईच्या पाठीचा आदर्श घ्यायला काय हरकत आहे? कोकिळेला पाह्यल्यावर रंगाने काळा असलेला हा पक्षी त्याच्या कंठातून किती मधूर स्वर येतात. तसेच मधूर स्वर जर आपल्या कंठातून बाहेर पडले तर किती छान होईल.

तेव्हा बालमित्रांनो ह्या सर्व गोष्टी पण तुम्ही ध्यानात घ्या आणि सुट्टीत जे जे काही पाहाल अनुभवाल त्यातून चांगल्या गोष्टी घेऊन पुढे चला आणि त्या नेहमी तुमच्या जवळ असू द्या. खुप खुप मजा करा आणि पुढच्या वर्षाचे हसत स्वागत करा. - मनिषा नवले, पुणे

## १ Doctor Tips — सल्ला डॉक्टरचा

### वैवाहिक जीवन सुधारण्यासाठी विशेष टिप्स



वैवाहिक जीवन आरोग्यासाठी चांगले मानले जाते. पण हे सुद्धा खूप आवश्यक आहे कि सहवास चा आनंद घेण्यासाठी योग्य मार्ग जाणून घेतला पाहिजे. या लेखात दिलेल्या सोप्या टिप्स चा वापर करून तुम्ही तुमचे सेक्स लाइफ मध्ये सुधार आणू शकता.१. सेक्स कण्याआधी ओरल सेक्स करणे महत्वाचे आहे. ही क्रिया सहवास मध्ये महत्वाची भूमिका बंजावते. या क्रियेमुळे तुम्ही सहवास चा आनंद खूप चांगल्या प्रकारे घेऊ शकता.

## २ Joke — विनोद




बाबू - तुझे वडील किती वर्षाचे आहेत.
राजू - माझ्याच वयाचे आहेत.
बाबू - अरे पण हे कसं शक्य आहे.
राजू - का नाही शक्य? अरे मी जन्मलो, नि ते वडील बनले ना स!

## ३ Message — संदेश




Aik rikshaw ke peche likha tha k
"SAWAN KA INTAZAR HAI"
Peche se aik truck aya or rikshaw ko oraa dia(hit kia)
or us ke peche likha tha "AYA SAWAN JHOOM KE".

## ४ Thought — सुविचार




**संधी या देवतेच्या डोक्यावर एकही केस नसतो.**
**- टेरेन्स**

### संस्कृत सुभाषित

**अप्राप्तकालं वचनं बृहस्पतिरपि ब्रुवन्**
**लभते बुद्ध्यवज्ञानमवानं च भारत ॥**
(उद्योगपर्व, अध्याय ३९, ोक २ महाभारत)
**अर्थ -**

# मनोरंजक महाशब्दकोडे



**आडवे शब्द**

१. मागाहून, मग
३. कथांमधील भला मोठा नाग
६. सापाची एक जात
९. तळे, धरण, विहीर इ.
११. एक मंगल वाद्य
१३. वागणूक
१४. परमेश्वर
१५. मोठा डेरेदार वृक्ष
१८. विल्हेवाट, निकाल (लावणे)
१९. अंगावरील बारीक केस
२२. कबूतर
२३. चंद्र, एक वनस्पती
२५. मुलगा-मुलगी
२८. अत्यंत धनाढ्य मनुष्य
३२. काळ्या तोंडाचा हुप्या
३३. करसेवेचा अपभ्रंश - सेवा
३४. रोग झालेला, आजारी
३५. सारखा
३६. सदोदित
३७. चिवचिवाट
३९. हुबेहुब प्रत बनवणारा
४१. मांडणी, सजावट
४२. शुष्कता
४३. धुणे
४७. धुसफूस
४९. धातूचा धागा
५०. बुजणारी
५१. तारीख
५२. पद्धतीप्रमाणे
५३अ. पाणी
५४. मांडी न घालता बसलेला
५५. नेहमी, वारंवार
५७. खाट, चौपाई
५८. युवराज
६०. सापाची एक जात
६१. आपला नसलेला
६३. बातमीदार
६५. घोडागाडी
६६. धमकी
६७. त्रास, वैताग, बडबड
६९. पाठविलेला
७१. रवाळ
७३. मूळ आधार
७४. तिथीप्रमाणे बदलत जाणारा चंद्राचा आकार
७६. डोळे
७८. हाताचा तळवा
७९. पाप
८०. एकावर एक रचलेल्या वस्तू (उदा. गोवऱ्या, पुस्तके)
८१. पादत्राण

**उभे शब्द**

१. ठोंब्या माणूस, शंकराचे वाहन
२. दुलई
३. नष्ट
४. मृत
५. रमापती
६. जमीनदोस्त
७. तृण
८. द्रव्य, पैसा
१०. प्रेत (हिंदी)
१२. नूतन
१६. भारतीय चलन
१७. पाठवणी
२०. जमीनदार
२१. भूतकाळ
२३. सुविधा
२४. पाठीतील हाडांच्या माळेतील मणी
२६. पुरुष
२७. पाताळ
२९. न वापरलेला
३०. नसलेला
३१. श्रीरामाचे स्तोत्र
३२. गंध
३४. जाड पोळी
३७. तंबूची कापडी भिंत
३८. साखळी लावलेला दिवा
३९. बोटाच्या टोकावरील आवरण
४०. लक्षाचा आकडा
४२. तापापूर्वीचे शहारे
४४. वेल
४५. फार गार वा उष्ण नसलेले
४६. निर्लज्ज
४८. साठ मिनिटे
५०अ. ढग
५३. चापट, मऊ पदार्थाचा आघात
५४. पार्वती
५४अ. डुक्कर
५६. सुतळीच्या धाग्याचे कापड
५९. मदत
६०. संगीतातील एक राग
६१. झटकन
६२. मनोहरी, रम्य
६४. विरोध
६६. प्रत्येक, किंमत
६७. काळिमा, बट्टा
६८. डाक, पत्र
७०. श्वासाचा अवयव
७२. राक्षस
७५. लत्ताप्रहार
७७. जून्या जखमेची खूण

**आडवे उत्तर**

१.नंतर ३.नामकरण ६.भुजंग ९.जलाशय ११.सनई १३.वर्तन १४.ईश १५.तरुवर १८.वासलात १९.लव २२.पारवा २३.सोम २५.तनयतनया २८.नवकोटनारायण ३२.वानर ३३.कार ३४.रोगी ३५.सम ३६.सदा ३७.कलकलाट ३९.नकलाकार ४१.रचना ४२.रखरख ४३.क्षालन ४७.तणतण ४९.तार ५०.लाजरी ५१.दिनांक ५२.रीतसर ५३अ. जल ५४.उकीडवा ५५.सतत ५७.पलंग ५८.राजकुमार ६०.मणेर ६१.परका ६३३. वार्ताहर ६५.टमटम ६६.दम ६७.कटकट ६९.रवाना ७१.कणीदार ७३.पाया ७४.कला ७६.नयन ७८.करतल ७९.पातक ८०.थप्पी ८१.वहाण

**उभे उत्तर**

१.नंदीबैल २.रजई ३.नाश ४.मयत ५.रमावर ६.भुईसपाट ७.गवत ८.धन १०.लाश १२.नवा १६.रुपाया १७.रव-ानगी २०.वतनदार २१.गतकाल २३.सोय २४.मणका २६.नर २७.नरक २९.कोरा करकरीत ३०.नासका ३१.रामरक्षा ३२.वास ३४.रोट ३७.कनात ३८.लामणदिवा ३९.नख ४०.लाख ४२.रसकसणे ४४.लता ४५.नरम गरम ४६.निलाजरा ४८.तास ५०अ.जलज ५३.रपका ५४.उमा ५४अ.कीरवा ५६.तरट ५९.कुमक ६०.मरवा ६१.पटकन ६२.रमणीय ६४.हरकत ६६.दर ६७.कलंक ६८.टपाल ७०.नाक ७२.दानव ७५.लाथ ७७.व्रण



# क्रीडा विश्व



## थोडक्यात/ संक्षिप्त




### वसीम अक्रमने पाकिस्तान क्रिकेट संघाला सुनावले

मुंबई –सुरक्षेचं कारण देत बांगलादेश क्रिकेट बोर्डाने आगामी टी–२० विश्वचषक भारतात न खेळण्याचा निर्णय घेतला. टी–२० वर्ल्डकपमधील आमचे सामने श्रीलंकेत आयोजित करण्यात यावे, अशी मागणी बांगलादेश क्रिकेट बोर्डाकडून करण्यात आली होती. मात्र बांगलादेशची ही मागणी आयसीसीने फेटाळली. यानंतर बांगलादेशने टी–२० विश्वचषकावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला. सदर प्रकरणानंतर बांगलादेशच्या जागी स्कॉकटलंडला विश्वचषकात स्थान देण्यात आलं. आयसीसीच्या या निर्णयाचा पाकिस्तान क्रिकेट बोर्डानं विरोध करत त्यांनी बहिष्कार टाकण्याची धमकी दिली. याचदरम्यान, पाकिस्तान क्रिकेट संघाचा माजी कर्णधार आणि दिग्गज खेळाडू वसीम अक्रमने पाकिस्तान संघाला चांगलेच सुनावले आहे. बांगलादेश खेळायला तयार नाही म्हणून पाकिस्तान टी–२० विश्वचषकावर बहिष्कार टाकण्याचा विचार का करत आहे.

### मायकल क्लार्कचे असिस्टंट सोबत होते अफेअर, पत्नीने घटस्फोट घेतला

नवी दिल्ली–ऑस्ट्रेलियाचा माजी कॅप्टन मायकल क्लार्क त्याच्या क्रिकेटमधील करिअरसह विविध कारणांमुळं चर्चेत राहिला आहे. मायकल क्लार्कनं २०१२ मध्ये ऑस्ट्रेलियाची सुपर मॉडेल काइली बोन्डी हिच्यासोबत लग्न केलं होतं. तेव्हा त्यांच्या लग्नाची खूप चर्चा झाली होती. दोघेही नंतर मॉडेलिंग आणि क्रिकेट संदर्भातील कार्यक्रमांमध्ये दिसून यायचे. मात्र, मायकल क्लार्कनं निवृत्ती घेतल्यानंतर गोष्टी बदलल्या. क्लार्कचं त्याच्या असिस्टंट सोबत अफेअर असल्याचं समोर आलं आणि तेव्हापासून क्लार्क आणि काइली बोन्डी यांच्यातील नातं खराब झालं. क्लार्कचं त्याच्या असिस्टंट सोबत असणारं अफेअर ८ वर्षाचा संसार मोडण्यास कारणीभूत ठरलं. यानंतर मायकल क्लार्क आणि काइली बोन्डी यांचा घटस्फोट झाला.मायकल क्लार्कची घटस्फोटित पत्नी काइली बोन्डी ऑस्ट्रेलियातील नामांकित सेलिब्रेटी आहे. काइली मॉडेलिंगसह टीव्ही कार्यक्रमात प्रेझेंटर म्हणून प्रसिद्ध आहे. २०१९ मध्ये दोघांमध्ये वाद झाले होते. जेव्हा मायकल क्लार्क आणि त्याच्या असिस्टंटचं अफेअर समोर आलं होतं. धक्कादायक बाब म्हणजे काइली बोन्डी हिनं मायकल क्लार्क आणि त्याच्या असिस्टंटला एका हॉटेलमध्ये पकडलं होतं. या घटनेनंतर मायकल क्लार्कचं लग्न मोडलं होतं. मायकल क्लार्क आणि काइली बोन्डी यांचा घटस्फोट २०२० मध्ये झाला.

### वर्ल्डकपमधून माघारीचा फटका बांगलादेशच्या पत्रकारांना बसणार

नवी दिल्ली –बांगलादेशने टी२० वर्ल्डकपमधून माघार घेतल्याचे पडसाद आता उमटू लागले आहेत. टी२० वर्ल्डकपसाठी बांगलादेशचे अनेक पत्रकार भारत आणि श्रीलंकेत येणार होते. त्यासाठी त्यांनी अर्ज भरलेही होते. मात्र बांगलादेशने स्पर्धेतून माघार घेतल्याचा फटका या पत्रकारांना बसला आहे. या पत्रकारांना वर्ल्डकपचं वार्ताकन करण्यासाठी अधिस्वीकृती नाकारण्यात आलं आहे. बांगलादेशातून जवळपास दीडशे पत्रकारांनी टी२० वर्ल्डकपचं वार्ताकन करण्यासाठी अर्ज भरले होते. मात्र त्यांच्यापैकी कोणालाच परवानगी मिळालेली नाही.
या सगळ्यांचे अर्ज निकाली काढण्यात आले आहेत. पत्रकारांसाठी वर्ल्डकपचं वार्ताकन करणं हा कारर्किदीतील महत्त्वाचा क्षण असतो. मात्र बांगलादेश सरकारच्या निर्णयामुळे पत्रकारांना आता वर्ल्डकपचे सामने याचि देही याचि डोळा पाहणं आणि त्यासंदर्भात लिहिणं दुरापास्त झालं आहे. डेली स्टारने दिलेल्या वृत्तानुसार, १३० ते १५० इतक्या मोठ्या संख्येने बांगलादेशच्या पत्रकारांनी टी२० वर्ल्डकपच्या वार्ताकनासाठी अर्ज भरले होते. मात्र सगळ्यांच्या अर्जांना केराची टोपली दाखवण्यात आली आहे. बांगलादेश क्रिकेट बोर्डाच्या मीडिया कमिटचे चेअरमन अमझाद होसेन यांनी सांगितलं.
जेवढी मला माहिती आहे त्यानुसार बांगलादेशच्या सर्वच पत्रकारांचे अक्रीडिशन नाकारण्यात आले.

## विहान मल्होत्रा ठरला विजयाचा हिरा

## झिम्बाब्वेला केवळ १४८ धावांवर रोखले

# टीम इंडियाचा झिम्बाब्वेवर मोठा विजय




**नवी दिल्ली:** भारत आणि झिम्बाब्वे यांच्यात झालेल्या सामन्यात भारतीय संघाने २०४ धावांनी विजय मिळवला आहे. आयसीसी अंडर–१९ वर्ल्डकप २०२६ स्पर्धेत भारतीय संघाची विजयी घोडदौड कायम आहे. आयुष म्हात्रेच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या भारतीय संघाने बुलावायोतील क्वीन्स पार्कच्या मैदानावर झालेल्या सामन्यात झिम्बाब्वेवर मोठ्या विजयाची नोंद केली आहे. या सामन्यात भारतीय खेळाडूंकडून ऑलराऊंड कामगिरी पाहायला मिळाली. पहिल्या डावात फलंदाजी करताना भारतीय फलंदाजांनी ३५२ धावांचा भलामोठा डोंगर उभारला. या धावांचा बचाव करताना भारतीय गोलंदाजांनी झिम्बाब्वेला १४८ धावांवर रोखलं. यासह हा सामना २०४ धावांनी आपल्या नावावर केला.या सामन्यात झिम्बाब्वेने नाणेफेक जिंकून भारतीय संघाला प्रथम फलंदाजी करण्याचं आमंत्रण दिलं होतं. हा निर्णय भारतीय फलंदाजांनी




चुकीचा ठरवत झिम्बाब्वेच्या गोलंदाजांची चांगलीच धुलाई केली. सलामीला आलेल्या आरोन जॉर्ज आणि वैभव सूर्यवंशी यांनी दमदार सुरूवात करून दिली. आरोन जॉर्जने २३ धावा केल्या. तर वैभव सूर्यवंशीने २४ चेंडूत वेगवान अर्धशतक झळकावलं. तर आयुष म्हात्रेने २१ धावांची खेळी केली. सुरूवात चांगली मिळाल्यानंतर मधल्या काही षटकांमध्ये भारतीय संघाचा डाव गडबडला होता. पण शेवटी विहान मल्होत्रा आणि अभिज्ञान कुंडूने मिळून भारतीय संघाचा डाव सांभाळला. विहान मल्होत्राने १०९ धावांची दमदार शतकी खेळी केली. तर अभिज्ञान कुंडूने ६१ धावांचे योगदान दिले. या दमदार खेळीच्या बळावर भारतीय संघाने ५० षटकांअखेर ८ गडी बाद ३५२ धावांचा डोंगर उभारला.
फलंदाजांनी आपलं काम केल्यानंतर गोलंदाजांनी देखील आपली भूमिका योग्यरित्या पार पाडली. झिम्बाब्वेच्या फलंदाजांनी धावांचा पाठलाग करताना पूर्ण जोर लावला. पण भारतीय गोलंदाजांच्या धारदार गोलंदाजीसमोर त्यांचा निभाव लागू शकला नाही. झिम्बाब्वेकडून फलंदाजी करताना क्यान ब्लायनॉटने ३८ धावांची खेळी केली. तर लीरॉय चिवाउलाने ६२ धावांची दमदार अर्धशतकी खेळी केली. पण उद्धव मोहनने त्याला बाद करत माघारी धाडलं. तटेंडा चिमगोरोने २९ धावांची खेळी करून हातभार लावला. पण त्याला इतर कुठल्याही फलंदाजाकडून हवी तशी साथ मिळाली नाही. त्यामुळे झिम्बाब्वेचा संपूर्ण डाव अवघ्या १४८ धावांवर आटोपला.
भारतीय संघाकडून गोलंदाजी करताना उद्धव मोहन आणि कर्णधार आयुष म्हात्रेने प्रत्येकी ३– ३ गडी बाद केले. तर आरएस अंब्रिशने २ गडी बाद केले. तर हेनिल पटेल आणि खिलन पटेल यांनी प्रत्येकी १–१ गडी बाद केला. झिम्बाब्वेचा संपूर्ण डाव अवघ्या १४८ धावांवर आटोपला.

# २३ शतके ठोकणाऱ्या भारताच्या क्रिकेटपटूला केले पोलीसांनी अटक

#### दारु पिऊन लग्जरी कारने उडवली अनेक वाहने

वडोदा–गुजरातमधील वडोदऱ्यात भारताचा माजी आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू जेकब मार्टिन यांना मद्यधुंद अवस्थेत वाहन चालवल्याप्रकरणी अकोटा पोलिसांनी अटक केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार अकोटा दांडिया बाजार ब्रिजवर मार्टिन एमजी हेक्टर कार चालवत होते. नशेच्या अवस्थेत वाहनावरील नियंत्रण सुटल्याने त्यांच्या कारने दोन ते तीन वाहनांना धडक दिली. घटनेनंतर परिसरात गोंधळ उडाला.
घटनेची माहिती मिळताच अकोटा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. तपासादरम्यान ही घटना ड्रिंक अँड ड्राईव्हची असल्याचे पोलिसांनी सांगितले. सुदैवाने या अपघातात मोठी जीवितहानी झाल्याचे वृत्त नाही.
सुमारे सात वर्षापूर्वी वडोदऱ्यात झालेल्या एका गंभीर अपघातात जेकब मार्टिन यांच्या यकृत आणि फुफ्फुसांना गंभीर इजा झाली होती. त्या काळात उपचारासाठी कुटुंबाकडे पुरेसा निधी उरलेला नव्हता. आर्थिक अडचणींमुळे कुटुंबाने मदतीचे आवाहन केले होते. त्यानंतर बीसीसीआय, बडोदा क्रिकेट असोसिएशन आणि अनेक क्रिकेटपटूंनी त्यांच्या उपचारांसाठी मदतीचा हात पुढे केला होता.
जेकब मार्टिन हे भारतीय क्रिकेटमधील एक परिचित नाव राहिले आहेत. त्यांनी भारताकडून १० एकदिवसीय (ध्द) सामने खेळले असले, तरी त्यांची खरी ओळख फर्स्ट क्लास क्रिकेटमधील त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीमुळे निर्माण झाली. मार्टिन यांनी आपल्या कारकिर्दीत १३८ फर्स्ट क्लास सामन्यांत ९,१९२ धावा केल्या असून, त्यामध्ये २३ दमदार शतकांचा समावेश आहे. प्रभावी मधल्या फळीतील फलंदाज म्हणून त्यांची ओळख होती. याशिवाय ६९ लिस्ट–ए सामन्यांत त्यांनी २,२१७ धावा केल्या आहेत.
जेकब मार्टिन हे बडोदा क्रिकेट असोसिएशनच्या अंडर–१९ संघाचे प्रशिक्षकही राहिले आहेत. त्यांनी भारताकडून १९९९ ते २००१ या कालावधीत १० एकदिवसीय सामने खेळले असून, त्यांची सरासरी २२.५७ अशी होती. १९९९ मध्ये वेस्ट इंडिजविरुद्ध सौरव गांगुलीच्या नेतृत्वाखाली त्यांनी भारतासाठी पदार्पण केले होते.
मार्टिन यांच्या नेतृत्वाखाली वडोदरा संघाने २०००–०१ हंगामात रणजी ट्रॉफी जिंकली होती. देशांतर्गत क्रिकेटमध्ये त्यांनी बडोदा आणि रेल्वे संघांचे प्रतिनिधित्व केले.




### खुन्नस देत होता बॉलर, वैभव सूर्यवंशीने थेट स्टेडियमच्या बाहेर मारला सिक्स

**दिल्ली**–अंडर १९ वर्ल्ड कप २०२६ मध्ये टीम इंडियाने ग्रुप स्टेजचे सर्व सामने जिंकून सुपर सिक्स स्टेजमध्ये स्थान मिळवलं. या सुपर सिक्स स्टेजमध्ये भारताचा पहिला सामना हा झिम्बाब्वे विरुद्ध झाला. हा सामना बुलावायोच्या क्वींस स्पोर्ट्स क्लब स्टेडियमवर खेळवण्यात आलं असून यात भारताचा १४ वर्षीय फलंदाज वैभव सूर्यवंशीने विस्फोटक फलंदाजी केली. झिम्बाब्वेच्या अंडर १९ संघाने टॉस जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. त्यानंतर वैभव सूर्यवंशी आणि त्याचा जोडीदार एरोन जॉर्जने टीम इंडियासाठी वेगवान सुरुवात करून दिली. दोघांनी पहिल्या विकेटसाठी ४४ धावांची भागीदारी केली. एरोन जॉर्ज २३ धावा करून आउट झाला पण वैभवने झिम्बाब्वेच्या गोलंदाजांची धुलाई केली.
वैभव सूर्यवंशीने फलंदाजी करताना ३० बॉलमध्ये ५२ धावांची खेळी केली या दरम्यान त्याने ४ सिक्स आणि ४ चौकार लगावले. यावेळी झिम्बाब्वेच्या गोलंदाजांवर दबाव वाढला होता, तेव्हा ५ व्या ओव्हरमध्ये हायव्होल्टेज ड्रामा झाला. वैभव सूर्यवंशीने झिम्बाब्वेचा वेगवान गोलंदाजाच्या ५ व्या बॉलवर जबरदस्त षटकार ठोकला. यावेळी बॉल स्टेडियमच्या बाहेर गेला आणि तो परत आणायला सुद्धा खूप वेळ झाला.
वैभव सूर्यवंशी गोलंदाजाने घेतला पंगा :
वैभव सूर्यवंशीने स्टेडियम बाहेर जबरदस्त सिक्स मारल्यावर सुद्धा झिम्बाब्वेचा वेगवान गोलंदाज पनाशे मजाई त्याला डोळे दाखवत राहिला. मग भारतीय खेळाडू सुद्धा कुठे मागे हटणार होते. जेवढ्या वेळ मजाई हा वैभव सूर्यवंशीला डोळे दाखवत होता तोपर्यंत त्याने वैभवने सुद्धा त्याचे डोळे मिचकावले नाहीत आणि तो सुद्धा त्याच्याकडे तसाच बघत होता. त्यानंतर, पुढच्याच ओव्हरमध्ये त्याने मजाईच्या गोलंदाजीवर २ सिक्स आणि एक चौकार ठोकला आणि १८ धावा केल्या.
वैभव सूर्यवंशीने केलं अर्धशतक :
झिम्बाब्वे विरुद्ध सामन्यात वैभव सूर्यवंशी ज्या अंदाजात खेळत होता असं वाटलं की त्याच्या बॅटमधून अजून एक शतक येणार आहे. पण ३० बॉलवर ५२ धावा करून वैभव बाद झाला. त्याने २४ बॉलमध्ये अर्धशतक ठोकलं. १४ वर्षीय वैभवने त्याच्या खेळीदरम्यान चार चौकार आणि चार सिस्क मारले. टीम इंडियाकडून विहान मल्होत्राने १०९ धावांची खेळी करत अर्धशतक ठोकले. टीम इंडियाने ८ विकेट्स गमावून ३५२ धावांची खेळी केली. टीम इंडियाने ८ विकेट्स गमावून ३५२ धावांची खेळी केली आणि टीम इंडियाला ३५३ धावांचे आव्हान दिले.

# जो रूटने मोडला सौरव गांगुली अन् रोहित शर्माचा रेकॉर्ड!

मुंबई–इंग्लंडचा अनुभवी फलंदाज जो रूटने कसोटी क्रिकेटमध्ये फलंदाजी करताना अनेक मोठे रेकॉर्ड मोडून काढले आहेत. कसोटी क्रिकेटमध्ये तो सचिन तेंडुलकरच्या सर्वाधिक धावा करण्याच्या विक्रमाच्या अगदी जवळ पोहोचला आहे. आता वनडे क्रिकेटमध्येही त्याच्या फलंदाजीचा बोलबाला पाहायला मिळाला आहे. इंग्लंडचा संघ सध्या श्रीलंका दौऱ्यावर आहे. दोन्ही संघांमध्ये ३ वनडे सामन्यांची मालिका सुरू आहे. ही मालिका सध्या १–१ ने बरोबरीत आहे. त्यामुळे मालिकेतील तिसरा सामना दोन्ही संघांसाठी निर्णायक आहे. या सामन्यातील पहिल्या डावात फलंदाजी करताना हॅरी ब्रूकने नाबाद १३७ धावांची खेळी केली. तर जो रूट देखील १११ धावांवर नाबाद राहिला. दरम्यान जो रूटच्या नावे मोठ्या रेकॉर्डची नोंद झाली आहे.
श्रीलंकेतील आर. प्रेमदासा स्टेडियममध्ये सुरू असलेल्या या सामन्यात इंग्लंडने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय इंग्लंडच्या फलंदाजांनी सार्थ ठरवला. जो रूट आणि हॅरी ब्रूकच्या शतकी खेळीच्या बळावर इंग्लंडने पहिल्या डावात ३ गडी बाद ३५७ धावांचा भलामोठा डोंगर उभारला. यादरम्यान जो रूटने ५४ चेंडूत आपलं अर्धशतक पूर्ण केलं. या अर्धशतकी खेळीसह त्याने वनडे क्रिकेटमध्ये ७५०० धावांचा पल्ला गाठला आहे.

**अशी कामगिरी करणारा ठरला चौथा फलंदाज**


वनडे क्रिकेटमध्ये ७५०० धावांचा पल्ला गाठताच जो रूटच्या नावे मोठ्या विक्रमाची नोंद झाली आहे. रूट हा वनडे क्रिकेटमध्ये सर्वात जलद ७५०० धावा करणारा चौथा फलंदाज ठरला आहे. रूटने १७८ वनडे डावात हा पल्ला गाठला आहे. तर या यादीत अव्वल स्थानी असलेल्या हाशिम आम्लाने सर्वात जलद १६० डावात ७५०० धावांचा पल्ला गाठला होता. या यादीत दुसऱ्या स्थानी असलेल्या विराट कोहलीने १६७ डावात ७५०० धावांचा पल्ला गाठला होता.

### क्रिकेटमधील पराभवाचा राग जीवावर बेतला!

बंगळुरू–कर्नाटकची राजधानी बंगळुरूमध्ये एका क्रिकेट सामन्यानंतर झालेल्या वादाचे पर्यावसान भीषण हत्याकांडात झाले आहे. किरकोळ वादातून एका २७ वर्षीय तरुणाने आपल्या मित्राच्या चालत्या कारला लटकून थांबवण्याचा प्रयत्न केला, मात्र मित्राने क्रूरतेचा कळस गाठत कार थेट झाडावर आदळली. या भीषण अपघातात कारला लटकलेल्या तरुणाचा जागीच मृत्यू झाला असून, हा सर्व अंगावर शहारे आणणारा प्रकार कारच्या डॅशकॅममध्ये कैद झाला आहे.
नेमकी घटना काय?मिळालेल्या माहितीनुसार, मृत प्रशांत (वय २८, रा. हेब्बागोडी) आणि त्याचा मित्र रोशन हेगडे (वय २७) हे एका स्थानिक क्रिकेट स्पर्धेत सहभागी झाले होते.

# पाकला चारही बाजूंनी घेरले, कितीही धमक्या दिल्या तरी बॉयकॉट करता येणार नाही

दुबई–टी–२० वर्ल्ड कपच्या तोंडावर आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधले वाद काही कमी व्हायचे नाव घेत नाहीयेत.
बांगलादेशने टी–२० वर्ल्ड कपवर बहिष्कार टाकला, त्यानंतर आता पाकिस्तानकडूनही बहिष्काराची धमकी दिली जात आहे. बांगलादेशला पाठिंबा म्हणून पाकिस्तानकडून स्पर्धेवर बहिष्कार टाकण्याचा विचार केला जात आहे, यासाठी पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे प्रमुख मोहसिन नक्वी यांनी पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांची भेट घेतली.
टी–२० वर्ल्ड कपमध्ये खेळायचे का नाही? याचा अंतिम निर्णय सरकार घेईल, असं मोहसिन नक्वी पाकिस्तानी पंतप्रधान शाहबाज शरीफ यांच्या भेटीनंतर म्हणाले आहेत. बहिष्काराची धमकी दिली जात असली, तरी पाकिस्तानला ते शक्य करून दाखवणे जवळपास अशक्य आहे, कारण आयसीसीने पाकिस्तानला चारही बाजूंनी घेरले आहे.
१ कायदेशीर कारवाईमध्ये अडकणार पाकिस्तान
आयसीसी प्रत्येक मोठ्या स्पर्धेआधी सगळ्या पूर्ण सदस्य असलेल्या बोर्डाकडून टुर्नामेंट पार्टिसिपेशन एग्रीमेंट वर सही करून घेते. हा कोणताही साधासुधा कागद नाही तर कायदेशीरदृष्ट्या बाध्य असा करार असतो. पाकिस्तान स्पर्धेतून बाहेर झाली तर या कराराचा भंग होईल, ज्यामुळे आयसीसी पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचा वार्षिक महसूल रोखून धरेल. हा महसूल जवळपास ३४–३५ मिलियन डॉलर आहे. आधीपासूनच आर्थिक संकटात असणाऱ्या पाकिस्तान क्रिकेट बोर्डासाठी हा सगळ्यात मोठा धक्का असेल.



२ पाकिस्तान क्रिकेट बोर्डावर बंदी
पाकिस्तानने वर्ल्ड कपमधून हटण्याचा निर्णय सरकारी दबावातून घेतल्याचं सिद्ध झालं, तर आयसीसी पीसीबीवर बंदीची कारवाईही करू शकते. आयसीसीच्या नियमांमध्ये कोणत्याही बोर्डामध्ये राजकीय हस्तक्षेप झाल्याचं दिसून आल्यास कडक कारवाईचं प्रावधान आहे.
झिम्बाब्वे आणि श्रीलंकेवर याआधी आयसीसीने निलंबनाची कारवाई केली होती. तसंच पाकिस्तानने वर्ल्ड कपवर बहिष्कार टाकला तर त्यांना आशिया कपमधूनही बाहेर केलं जाईल. एवढंच नाही तर भविष्यात आयसीसी पाकिस्तान क्रिकेट बोर्डाला मोठ्या स्पर्धांच्या आयोजनाची संधीही देणार नाही, ज्यात २०२८ चा महिला टी–२० वर्ल्ड कपचाही समावेश आहे.३ पीएसएल परदेशी खेळाडूंशिवाय पाकिस्तानने टी–२० वर्ल्ड कपवर बहिष्कार टाकला, तर इंग्लंड, ऑस्ट्रेलिया यांच्यासारखी बोर्ड त्यांच्या खेळाडूंना पीएसएलमध्ये खेळण्यासाठी एनओसी देणार नाहीत, त्यामुळे परदेशी खेळाडू पीएसएलमध्ये खेळू शकणार नाहीत. परदेशी खेळाडूंशिवाय पीएसएलची ब्रॅन्ड व्हॅल्यू, ब्रॉडकास्ट डील आणि स्पॉन्सरशीपही धोक्यात येईल, ज्यामुळे पाकिस्तान क्रिकेट बोर्डाला आणखी मोठा आर्थिक फटका बसेल.
४ द्विपक्षीय सीरिजही संकटात
क्रिकेट फक्त आयसीसी स्पर्धाच नाही तर दोन देशांमधल्या सीरिजवरही अवलंबून आहे. जर पाकिस्तानने वर्ल्ड कपवर बहिष्कार टाकला आणि आयसीसीने कारवाई केली तर दुसऱ्या क्रिकेट बोर्डांना पाकिस्तानसोबत क्रिकेट खेळणंही बंद करावं लागेल, ज्यामुळे पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचा महसूलच बंद होईल.
एवढे मोठे आर्थिक संकट पाहता पाकिस्तान क्रिकेट बोर्ड टी–२० वर्ल्ड कपवर बहिष्कार टाकण्याची शक्यता अत्यंत कमी आहे.

# लातूर जिल्ह्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा !

# सर्वोत्कृष्ट पहिल्या पाच जिल्हाधिकारी कार्यालयांमध्ये लातूरच्या जिल्हाधिकारी कार्यालयाचा समावेश







**लातूर/प्रतिनिधी :** राज्य शासनाच्या १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमांतर्गत राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांनी केलेल्या कामगिरीचे अंतिम मूल्यमापन भारतीय गुणवत्ता परिषद (क्वालिटी कौन्सिल ऑफ इंडिया) मार्फत करण्यात आले. या अंतर्गत राज्यातील सर्वोत्कृष्ट पाच जिल्हाधिकारी कार्यालयांची नावे राज्य शासनामार्फत प्रजासत्ताक दिनी जाहीर करण्यात आली आहेत. यामध्ये लातूर जिल्हाधिकारी कार्यालयाचाही समावेश असून यानिमित्ताने लातूर जिल्ह्याच्या शिरपेचात आणखी एक मनाचा तुरा रोवला गेला आहे. पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या नेतृत्वात लातूर जिल्हा प्रशासनाने राबविलेल्या उपक्रमांची यानिमित्ताने राज्यस्तरावर दखल घेण्यात आली आहे.

राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने राज्यातील प्रशासनिक कार्यालयांसाठी १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रम जाहीर केला होता. यामध्ये प्रशासन अधिक पारदर्शक, गतिमान, तंत्रज्ञानाधिष्ठित व नागरिकाभिमुख करणे, हा या उपक्रमाचा उद्देश होता. लातूर जिल्हाधिकारी कार्यालयाने १ जून २०२५ पासून या कार्यक्रमाची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरु केली होती. प्रामुख्याने संकेतस्थळ सुधारणा, सेवा हमी कायदा (आरटीएस), ई-ऑफिस प्रणाली, डेटा डॅशबोर्ड, व्हाटसअप चॅटबॉट, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि जीआयएस व रिमोट सेन्सिंग तंत्रज्ञानाचा वापर आदी बाबींचा समावेश होता.

**संकेतस्थळ झाले अद्ययावत; २३ भाषेत माहिती उपलब्ध**

या उपक्रमांतर्गत जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत पुरविण्यात येणाऱ्या सेवा, अंतर्गत कामकाज यामध्ये तंत्रज्ञानाचा वापर करण्यावर भर देण्यात आला. याचाच एक भाग म्हणून नागरिकांच्या सोयीसाठी लातूर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या संकेतस्थळावर २३ भाषांमध्ये माहिती उपलब्ध करून देण्यात आली. तसेच विविध महत्वाची संकेतस्थळे, समाज माध्यमे या संकेतस्थळाला जोडण्यात आली. नागरिकांना तक्रार व अभिप्राय देण्याची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली. हे संकेतस्थळ मोबाईलवर सहज वापरता यावे, यादृष्टीने रचना करण्यात आली. नागरिकांसाठी सोयीस्कर ठरणारी रचना व माहिती यामुळे आतापर्यंत ५ लाख ३१ हजारांहून अधिक नागरिकांनी संकेतस्थळाला भेट दिली आहे.

**ई-ऑफिसमुळे कामकाज गतिमान; सेवा जलद**

सेवा हमी कायदा अंतर्गत ४ लाख ९२ हजार अर्जांपैकी ९७.९३ टक्के अर्जांचा विहित कालावधीत निपटारा करण्यात आल्याने नागरिकांना जलद सेवा मिळाली. अहवाल कालावधीत ई-ऑफिस प्रणालीद्वारे ७२ हजार ६७१ ई-फाईल्स तयार करण्यात आल्या आहेत. तसेच एकूण ७६ हजार ८७८ ई-फाईल निकाली काढण्यात आल्या आहेत, त्यामुळे फाईल निपटाऱ्याचा कालावधी लक्षणीयरीत्या होवून कामकाज गतिमान झाले. यासोबत डॅशबोर्ड आधारित निर्णयप्रणालीमुळे कार्यालयीन कामकाजाचा ऑनलाईन आढावा घेणे शक्य झाले आहे.

**कार्यालयीन कामकाजासाठी 'एआय'ची मदत; वेळत बचत**

जिल्हाधिकारी कार्यालय व अधिनस्त उपविभागीय, तहसील कार्यालयांच्या कामकाजात कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) साधनांचा वापर वाढविण्यावर या उपक्रम काळात भर देण्यात आला. यासाठी जिल्हा व तालुकास्तरावर अधिकारी, कर्मचारी यांच्या कार्यशाळा घेण्यात आला. कार्यालयीन कामकाजात कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) साधनांचा सुरु झाल्याने निर्णय प्रक्रियेतील वेळेची बचत होत असून कार्यालयीन कामकाजासाठी तयार करण्यात येणारे विविध मसुदे अचूक होण्यास मदत झाली आहे. तसेच, व्हाटसअप चॅटबॉटद्वारे ५० सेवा नागरिकांना व्हाटसअपवर उपलब्ध झाल्या असून नागरिकांना शासकीय योजना, प्रमाणपत्रे आणि आवश्यक सेवांबाबत माहिती, तसेच विविध शासकीय सेवांबाबत तक्रार नोंदवणे, तक्रारीची स्थिती तपासणे आणि अद्ययावत माहिती मिळविणे सोईचे झाले आहे. या सर्व बाबींच्या आधारे करण्यात आलेल्या मूल्यमापनात लातूर जिल्ह्याने एकूण १७९.२५ गुण प्राप्त करून राज्यातील पाच उत्कृष्ट जिल्ह्यांमध्ये स्थान मिळविले आहे.

**जिल्हाधिकारी कार्यालयातील सर्व शाखांच्या समन्वयातून उत्कृष्ट कामगिरी**

जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली अपर जिल्हाधिकारी शिल्पा करमरकर, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, उपजिल्हाधिकारी संगीता टकले, उपजिल्हाधिकारी गणेश पवार, उपजिल्हाधिकारी संदीप कुलकर्णी, उपजिल्हाधिकारी सायली ठाकूर, जिल्हा पुरवठा अधिकारी व्यंकटेश रावलोड, जिल्हा सूचना व विज्ञान अधिकारी पुरुषोत्तम रुक्मे, महाआयटीचे जिल्हा प्रकल्प व्यवस्थापक रिजवान मुल्ला, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी साकेब उस्मानी यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालय अंतर्गत सर्वच शाखांतील अधिकारी, कर्मचारी यांनी १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमांतर्गत उत्कृष्ट कामिगिरी केली.

**'टीम वर्क'मुळे चांगली कामगिरी शक्य झाली : जिल्हाधिकारी**

प्रशासन अधिक पारदर्शक, गतिमान, तंत्रज्ञानाधिष्ठित व नागरिकाभिमुख करण्यासाठी राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागामार्फत राबविण्यात आलेल्या १५० दिवसांच्या महत्त्वाकांक्षी ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमांतर्गत लातूर जिल्हाधिकारी कार्यालयाने राज्यातील पहिल्या पाच उत्कृष्ट जिल्ह्यांमध्ये स्थान मिळविले आहे, ही समाधानाची बाब आहे. जिल्हाधिकारी कार्यालय व अधिनस्त कार्यालयातील सर्व अधिकारी, कर्मचारी यांच्या 'टीम वर्क'मुळे या उपक्रम कालावधीत नागरिकांसाठी चांगले काम करता आले. या कामाची दखल घेवून लातूर जिल्हाधिकारी कार्यालयाची निवड झाली, असे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे म्हणाल्या. नागरिकांसाठी गतिमान व पारदर्शक सेवा देण्यासाठी यापुढेही विविध उपक्रम हाती घेण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

**गेल्या तीन वर्षात जिल्ह्याला मिळालेला सातवा पुरस्कार**

लातूर जिल्ह्याला गेल्या सुमारे तीन वर्षांत मिळालेला हा सातवा राष्ट्रीय तथा राज्य स्तरावरील पुरस्कार ठरला आहे. यामध्ये जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांना मिळालेला लोकसत्ता आणि गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिकल अँड इकॉनॉमिक्सकडून सलग दोन वर्षे प्रथम क्रमांकाचा जिल्हा निर्देशांक पुरस्कार, सशस्त्र सेना ध्वज निधी संकलनामध्ये उत्कृष्ट कामिगीरीबद्दल राज्यस्तरीय पुरस्कार, दिव्यांग मुलांसाठी राबविलेल्या उपक्रमाबाबत स्कॉच अवार्ड, लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ मधील उत्कृष्ट कामगिरीबद्दल उत्कृष्ट निवडणूक निर्णय अधिकारी पुरस्कार, उद्योग क्षेत्रातील कामगिरीबद्दल 'निर्यात पुरस्कार २०२५', मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम अंतर्गत सलग दोन वर्षे पुरस्कार आदी पुरस्कारांचा समावेश आहे.

**१५० दिवसांच्या सेवाकर्मी कार्यक्रमात जिल्ह्यातील चारही नगरपरिषदांची उत्कृष्ट कामगिरी**

पारदर्शक, गतिमान सुप्रशासनाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी अधिकारी, कर्मचारी यांच्या शासकीय सेवाविषयक प्रगतीचे मूल्यांकन करण्यासाठी १५० दिवसांचा सेवाकर्मी कार्यक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमांतर्गत नगरपालिका गटात निवड झालेल्या राज्यातील १७ पैकी ९ नगरपालिका या छत्रपती संभाजीनगर विभागातील आहेत. यामध्ये लातूर जिल्ह्यातील सर्व चारही नगरपालिकांचा समावेश आहे. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांचे मार्गदर्शन व जिल्हा नगरपालिका प्रशासन सहआयुक्त अजितकुमार डोके यांच्या नियोजनातून उदगीरक, अहमदपूर, निलंगा व औसा या ४ नगरपालिका यांना ही सर्वोत्तम कामगिरी केली आहे.

## निवडणूकीत कर्जमाफीचे आश्वासन देऊन निकालानंतर विसरणाऱ्या व भूलथापा देणाऱ्या विरोधकांना या निवडणुकीत मत मागण्याचा अधिकार नाही : माजी मंत्री, आमदार देशमुख

**लातूर/प्रतिनिधी :** ''शेतकऱ्यांच्या सोयाबीनला भाव न देणारे, खरेदी केंद्रावर अडवणूक करणारे आणि निवडणुकीत कर्जमाफीच्या भूलथापा देऊन शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या विरोधकांना आता मत मागण्याचा अधिकार उरलेला नाही. जिल्हा परिषदेत ठेकेदारांचे खिसे भरणाऱ्यांना आता त्यांची जागा दाखवण्याची वेळ आली आहे, अशा कडक शब्दांत माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी महायुती सरकारवर तोफ डागली.

लातुर जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक २०२६ अनुषंगाने राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातुर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि शेषराव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली सोमवार दि. २६ जानेवारी रोजी लामजना येथील बाजार मैदान भागात सकाळी पार पडलेल्या प्रचार सभेत मान्यवरांच्या हस्ते श्रीफळ वाढवून प्रचाराचा शुभारंभ करण्यात आला.

यावेळी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शेषेराव पाटील, श्रीशैल उटगे, अमर खानापुरे, सचिन पाटील किरण बाबळसुरे, सुभाष पवार, समद पटेल, चंदरनाना पाटील, गणपतराव बाजुळगे, संजय सुग्रीव लोंढे, बालाप्रसाद बिदादा, दत्तोपंत सूर्यवंशी, बालाजी कांबळे, बाळासाहेब सांगवे, नारायण बजाज, अशोक शेळके, बाबासाहेब गायकवाड, मुकेश बिदादा, शिवा पाटील, जयराज पाटील, रामदास चव्हाण, उदयसिंह देशमुख, सुग्रीव लोंढे, जहीर पटवारी, बालाजी बिराजदार, महेबूब कारभारी, विशाल कांबळे, इस्माईल शेख, राहुल घुळे, दीपक राठोड, काँग्रेस महाविकास आघाडीचे जिल्हा परिषद लामजना गटातील उमेदवार सौ शालिनी चव्हाण, किल्लारी गटातील उमेदवार सुभाष पवार, खरोसा गटातील उमेदवार सचिन पाटील तर पंचायत समिती लामजना गणातील उमेदवार अंजूमबी महेबूब कारभारी, नागरसोगा येथील उमेदवार भाग्यश्री सूर्यवंशी, किल्लारी येथील उमेदवार माधव बिराजदार, तळणी येथील उमेदवार अभिजीत देशमुख, खरोसा येथील उमेदवार शीतल विष्णू फावडे, कारला येथील उमेदवार प्रवीण काळे आदिसह काँग्रेस व महाविकास आघाडीचे विविध पदाधिकारी कार्यकर्ते मतदार बंधू भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलतांना माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले, सामान्य माणसाच्या मतावर पोळ्या भाजण्याचे काम भाजपची मंडळी करीत आहेत. मतदारसंघात हजारो कोटी निधी आणल्याचे ते सांगतात, मग विकास कामे का दिसत नाहीत असा आता जनतेलाच प्रश्न पडला आहे, सत्तेच्या नशेत धुंद झालेले हे सत्ताधारी लोक, फक्त ठेकेदारांचे खिसे भरण्याचे काम करीत आहेत, कोणत्याही निवडणुका आल्या की भाजपकडून उमेदवाऱ्याही ठेकेदारांना दिल्या जात आहेत, औसा तालुक्यातील बहुतांश भाजपाचे उमेदवार ठेकेदारच असल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीत त्यांना धडा शिकवावा असे आवाहन जाहीर सभेत बोलताना केले.

यावेळी पूढे बोलतांना ते म्हणाले, सन १९९३ मध्ये झालेल्या प्रलयकारी भूकंपाची प्रारंभीच आठवण करून या आपत्ती काळात काँग्रेस नेत्यांनी जो जागतिक पुनर्वसन प्रकल्प राबवला त्याच्या दुरुस्तीचे कामही भाजपच्या मंडळींना मागच्या सत्ता काळात करता आले नसल्याचे यावेळी बोलताना सांगितले. काँग्रेस पक्षाने बांधलेले रस्ते, इमारती, याची दुरुस्तीही ज्यांना शक्य होत नाही असे सांगीतले. लातुर महानगरपालिका निवडणूक नुकतीच झाली आणि प्रचारात विरोधकांनी आदरणीय विलासराव देशमुख साहेबांच्या आठवणी पुसून टाकण्याची भाषा केली गेली ज्याचे उत्तर लातुरवासीयांनी चोख दिले. सत्तेच्या नशेत बेधुंद होऊन सामन्य माणसाच्या विचारांचा बाजार मांडणाऱ्या आदरणीय नेत्यांनी आपल्याला दिलेल्या विचारांचा खून करण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या या लोकांना त्यांची जागा दखविण्याची वेळ आता आली असून या निवडणुकीत आपण ही संधी गमावू नये असे अवाहन करीत विरोधकांच्या भूलथापांना बळी न पडता लातुर जिल्हा परिषदेला आपल्याला गत वैभव प्राप्त करून घ्यायचे आहे.प्रत्येक कामासाठी जिल्हा परिषदेत दर पत्रक या लोकांनी तयार करून ठेवले आहे.

## चन्नबस्वेश्वर फार्मसीच्या महिला सॉफ्टबॉल क्रिकेट संघास तृतीय पारितोषिक

**लातूर/प्रतिनिधी :**एन. बी. एस. फार्मसी, औसा येथे आयोजित करण्यात आलेल्या महिला सॉफ्टबॉल क्रिकेट स्पर्धेत चन्नबस्वेश्वर फार्मसी कॉलेज (डिग्री), लातूर या महाविद्यालयच्या महिला संघाने उल्लेखनीय कामगिरी करत तृतीय पारितोषिक पटकावले. स्पर्धेत विविध महाविद्यालयांतील महिला संघांनी सहभाग नोंदवला होता.

साखळी व बाद फेरीतील सामन्यांमध्ये चन्नबस्वेश्वर फार्मसी कॉलेज (डिग्री), लातूर या संघाने उत्कृष्ट फलंदाजी व प्रभावी गोलंदाजीचे प्रदर्शन केले. व कु. कापसे दीपा ने उत्कृष्ट गोलंदाजाचे पारितोषिक पटकावले. संघातील खेळाडूंनी संघभावना, शिस्त आणि खेळाडूवृत्तीचे दर्शन घडवत प्रेक्षकांची मने जिंकली.

या यशाबद्दल संस्थेचे सचिव मा. भिमाशंकर देवणीकर दादा व संस्थेचे संचालक मंडळ, व प्राचार्य डॉ. विजेंद्र स्वामी, यांनी प्रा. रोहित कोंबडे क्रीडा मार्गदर्शक, प्रा. अमोल नारागुडे व संघातील खेळाडू यांचे कौतुक केले. या यशामुळे महाविद्यालय/संस्थेच्या क्रीडा क्षेत्रातील वाटचालीस नवी प्रेरणा मिळाली आहे.



## श्रीकिशन सोमाणी विद्यालयाच्या इंडिया गेट प्रतिकृतीने वेधले लक्ष

**लातूर/प्रतिनिधी :** भारताच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून येथील अभिनव मानव विकास संस्थाद्वारा संचालित श्रीकिशन सोमाणी विद्यालयाच्या सामाजिक शास्त्र विभागाच्या वतीने साकारण्यात आलेल्या इंडिया गेटच्या सुंदर प्रतिकृतीने सगळ्यांचे लक्ष वेधून घेतले.

लातूरच्या शैक्षणिक क्षेत्रात आपल्या अभिनव उपक्रमांनी स्वतंत्र अस्तित्व निर्माण केलेल्या श्रीकिशन सोमाणी विद्यालयात प्रजासत्ताक दिनानिमित्त विविध उपक्रम राबविण्यात आले. यामध्ये विद्यार्थ्यांचे शिस्तबद्ध पथ संचलन , मानवी मनोरे, इयत्ता दहावीचा विद्यार्थी अनुराग सावंत याची योगा प्रात्यक्षिके, विद्यार्थ्यांची साहित्य कवायत, सामूहिक कवायत, देशभक्तीपर गीते अशा विविध उपक्रमांचा समावेश होता. यावेळी संस्थेचे सदस्य तथा ज्येष्ठ उद्योजक दिलीप माने यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे सचिव कमलकिशोर अग्रवाल, कोषाध्यक्ष जयेश बजाज, शालेय समितीचे अध्यक्ष, ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ अतुल देऊळगावकर, डॉ. रमेश जाजू, रामप्रसाद राठी, मुख्याध्यापक रमाकांत स्वामी आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.





या कार्यक्रमात विद्यालयाच्या राष्ट्रीय स्तरावर गेलेल्या खेळाडू विद्यार्थ्यांचाही मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या शिस्तबद्ध संचलन आणि प्रात्यक्षिकांनी सर्वांची मने जिंकली. विद्यार्थ्यांनी प्रमुख अतिथींना मानवंदना दिली. दरवर्षी प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून विद्यालयाच्या वतीने टाकाऊ वस्तूंपासून देशभक्तीपर प्रेरणादायी प्रतिकृती तयार करून विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले जाते. यावर्षी सामाजिक शास्त्र विभागाच्या शिक्षकांनी अत्यंत सुंदर अशी इंडिया गेटची आकर्षक प्रतिकृती तयार केली होती. या प्रतिकृतीने सगळ्यांचे लक्ष वेधून घेतले. संस्थेचे अध्यक्ष डॉ. चेतना सारडा यांनीही यावेळी या प्रतिकृतीचे निरीक्षण करून सामाजिक शास्त्र विभागाच्या संबंधित शिक्षकांचे कौतुक केले.

प्रमुख अतिथी दिलीप माने यांनी यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रजासत्ताक दिनाचे महत्व सोप्या शब्दात विशद केले. भारतीय राज्यघटनेने प्रदान केलेल्या अधिकारांचीही त्यांनी विद्यार्थ्यांना अतिशय सोप्या शब्दात माहिती दिली. विद्यार्थ्यांच्या पथसंचलनाने आपण प्रभावित झाल्याचे सांगून विद्यार्थ्यांना सर्वंकष शिक्षण देण्याचे काम श्रीकिशन सोमाणी विद्यालयाच्या माध्यमातून केले जात असल्याचे संगितले. विद्यार्थ्यांनी मोबाईलचा वापर अभ्यासाव्यतिरिक्त करणे घातक असल्याचेही त्यांनी यावेळी बोलून दाखविले . कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक रमाकांत स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यवेक्षक गिरीश कुलकर्णी, सुनीता जाधव, राहुल पांचाळ यांच्यासह सर्व शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## विशेष निवासी वार्षिक शिबिराचे उद्घाटन उत्साहात संपन्न

**लातूर/प्रतिनिधी :** दयानंद कला महाविद्यालय, लातूर येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने ''शाश्वत विकासासाठी युवक : जलसंधारण व्यवस्थापन आणि ओसाड भूमी विकास''या विषयावर विशेष निवासी वार्षिक युवक शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर २५ ते ३१ जानेवारी २०२६ या कालावधीत मौजे तळेगाव, ता. शिरूर अनंतपाळ, जि. लातूर येथे पार पडत आहे.

या शिबिराचा उद्घाटन समारंभ रविवार, दि. २५ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. डॉ. शिवाजी गायकवाड (प्राचार्य, दयानंद कला महाविद्यालय, लातूर) हे होते. उद्घाटक म्हणून मा. डॉ. मारोती गायकवाड (संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड) उपस्थित होते.





प्रमुख पाहुणे म्हणून मा.संजय पंचगल्ले (सहाय्यक शिक्षण संचालक व विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, लातूर), मा.अक्षय व्यंकटराव पाटील (सरपंच मौजे तळेगाव), प्रा.विजय गवळी यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी, महाविद्यालयाच्या उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी, उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे, प्रा. डॉ. संदीपान जगदाळे यांची उपस्थिती होती.

शिबिराच्या माध्यमातून जलसंधारण, वृक्षारोपण, ग्रामस्वच्छता, जनजागृती, पर्यावरण संवर्धन यांसारख्या उपक्रमांद्वारे युवकांमध्ये सामाजिक बांधिलकी आणि पर्यावरणाविषयी जागरूकता निर्माण करण्याचा उद्देश आहे.

कार्यक्रमाचे संयोजन रा.से.यो. कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. सुभाष कदम, प्रा. डॉ. रामेश्वर खंदारे, प्रा. अनिल भुरे व प्रा. सिद्धार्थ भालेराव यांनी केले आहे. शिबिरात सहभागी स्वयंसेवक मोठ्या उत्साहाने विविध सामाजिक उपक्रमात सहभाग घेत आहेत. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनुशा पिठले या स्वयंसेविकेने केले.

**प्रो. जडे यांचे रबरी शिक्के**
**कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले**
**टिकाऊ रबरी शिक्के**
**तयार करून मिळतील.**





शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# मोटारसायकलला कट मारल्याचा बहाणा करून लुटमार करणाऱ्या टोळीला विवेकानंद चौक पोलिसांकडून अटक; ४,६६,५५०/- किमतीचा मुद्देमाल हस्तगत

**लातूर /प्रतिनिधी:** लातूर शहरात घडणाऱ्या जबरी चोरी व लुटमारीच्या घटनांना आळा घालण्यासाठी व गुन्हेगारांचा शोध घेण्याकरिता पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे यांनी विविध पोलीस ठाण्यात घडलेल्या गुन्ह्यांचा आढावा घेऊन संबंधित प्रभारी अधिकारी व गुन्हे अन्वेषण पथकाला सूचना व मार्गदर्शन केले होते. त्या अनुषंगाने विवेकानंद चौक पोलीस स्टेशनच्या पथकाने अत्यंत तत्परता, कौशल्य व दक्षतेने कारवाई करून एका सराईत आरोपीस अटक केली असून त्याच्यासोबत असलेल्या दोन विधीसंघर्षग्रस्त बालकांना ताब्यात घेतले आहे. या कारवाईत एकूण ४,६६,५५०/- किमतीचा मुद्देमाल हस्तगत करून शहरात सक्रिय असलेल्या एका टोळीचा पर्दाफाश करण्यात पोलिसांना यश आले आहे.




पोलीस स्टेशन विवेकानंद चौक, लातूर हद्दीतील गरुड चौक, नांदेड रोड, लातूर येथे दिनांक २४/०१/२०२६ रोजी एक इसम मोटारसायकलवरून जात असताना विना नंबर प्लेट असलेल्या स्प्लेंडर मोटारसायकलवरून आलेल्या तीन अज्ञात इसमांनी त्याच्या वाहनास मुद्दाम कट मारला. तुमच्यामुळे आमचा मोबाईल फुटला आहे असा बनाव करून त्यांनी फिर्यादीची मोटारसायकल आडवली. त्यानंतर त्याला धमकावून, दहशत निर्माण करून त्याच्या हातातील अंदाजे ५ ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी जबरदस्तीने काढून घेतली व ते तिघेही आरोपी घटनास्थळावरून पळून गेले.या घटनेनंतर फिर्यादीने तात्काळ पोलीस स्टेशन विवेकानंद चौक येथे येऊन घडलेली घटना सांगितली. त्यावरून पोलीस स्टेशन विवेकानंद चौक येथे गुन्हा रजिस्टर नंबर ४५/२०२६ अन्वये कलम ३०९(४), ३(५) भारतीय न्याय संहिता (इछड) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

गुन्ह्याची गंभीरता लक्षात घेऊन पोलीस अधीक्षकांनी केलेल्या सूचना व मार्गदर्शन प्रमाणे विवेकानंद पोलीस ठाण्याच्या पोलीसांनी त्वरित तपास सुरू केला. घटनास्थळी मिळालेली माहिती, फिर्यादीने दिलेले वर्णन तसेच गुप्त बातमीदारांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे शहरात नाकाबंदी करण्यात आली. दरम्यान, संशयास्पदरीत्या फिरणारी विना नंबर प्लेट स्प्लेंडर मोटारसायकल पोलिसांच्या निदर्शनास आली. सदर मोटारसायकल अडवून तिच्यावर असलेल्या तीन इसमांना ताब्यात घेण्यात आले. त्यांना विश्वासात घेऊन चौकशी केली असता मुख्य आरोपी वसीम रज्जाक शेख, वय २६ वर्षे, रा. सिंदगाव, ता. रेणापूर, जि. लातूर. असून त्याच्यासोबतच्या दोन विधीसंघर्षग्रस्त बालकांच्या मदतीने शहरातील विविध भागांत अशाच पद्धतीने जबरी चोरी व लुटमारीचे गुन्हे केल्याची कबुली दिली. तपासादरम्यान असे निष्पन्न झाले की, सदर आरोपी व टोळीविरुद्ध १)पोलीस ठाणे विवेकानंद चौक, लातूर गु.र.नं. ४६/२०२६ कलम ३०३(२), ३(५) इछड. २)पोलीस ठाणे विवेकानंद चौक, लातूर गु.र.नं. ४८/२०२६ कलम ३०३(२), ३(५) इछड. ३)एमआयडीसी, लातूर गु.र.नं. ३२/२०२६ कलम ३०३(२), ३(५) इछड. ४)पोलीस ठाणे शिवाजीनगर, लातूर गु.र.नं. ४०/२०२६ कलम ३०३(२), ३५१, ३(५) इछड. प्रमाणे गुन्हे दाखल असून या सर्व गुन्ह्यांमध्ये आरोपींनी मोटारसायकलला कट मारणे, खोटा बहाणा करणे, नागरिकांना धमकावणे व त्यांच्या अंगावरील सोन्याचे दागिने जबरदस्तीने हिसकावून घेणे अशीच पद्धत अवलंबिल्याचे स्पष्ट झाले आहे.

सदर कारवाईत मुख्य आरोपी वसीम रज्जाक शेख यास अटक करण्यात आली असून दोन विधीसंघर्षग्रस्त बालकांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांच्याकडून वरील गुन्ह्यांतील गेला माल - एकूण ३४ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने तसेच गुन्हा करण्यासाठी वापरलेली मोटारसायकल असा एकूण ४,६६,५५०/- किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. मुख्य आरोपी वसीम रज्जाक शेख याच्यावर यापूर्वीही जबरी चोरी, लुटमार व तत्सम स्वरूपाचे गुन्हे दाखल असून तो सराईत गुन्हेगार असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. त्याच्यावर कठोर कारवाई करण्यात येत असून पुढील तपास सुरू आहे.

ही संपूर्ण उल्लेखनीय कामगिरी पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, यांचे सूचना व आदेशान्वये अपर पोलीस अधीक्षक श्री. मंगेश चव्हाण,उपविभागीय पोलीस अधिकारी, लातूर शहर श्री. समीरसिंह साळवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन विवेकानंद चौक, चे पोलीस निरीक्षक श्री. संतोष पाटील यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. खोडेवाड, श्री. मुळे, पोलीस उपनिरीक्षक रेडेकर, सफौ. गुंडरे,पोलीस अंमलदार, खुर्रम काझी, रविंद्र गोंदकर, यशपाल कांबळे, गणेश यादव, रणवीर देशमुख, धैर्यशील मुळे, सचिन राठोड, प्रेमानंद कांबळे, खंडू कोळी यांनी अत्यंत शिस्तबद्ध, धाडसी व कौशल्यपूर्ण कामगिरी बजावली आहे.



## जिजामाता कन्या प्रशाला लातूर येथे प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**लातूर /प्रतिनिधी:** शहरातील नांदेड रोड येथील जिजामाता कन्या प्रशाला येथे भारताचा ७७वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

प्रजासत्ताक दिन सोहळ्याचे मुख्य अतिथी तथा शिवछत्रपती शिक्षण संस्थेचे संचालक आनंद माने यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी प्रशालेच्या मुख्याध्यापिका सौ.प्रमिला भोसले,पर्यवेक्षक संतोष गुरव यांची प्रमुख उपस्थिती होती.

ध्वजारोहणानंतर विद्यार्थिनींनी कवायत, देशभक्तीपर गीत, भाषणे सादर केली. यावेळी प्रजासत्ताक दिनानिमित्त घेण्यात आलेल्या स्पर्धेत विजयी विद्यार्थिनींना संस्थेचे संचालक आनंद माने यांच्या हस्ते बक्षीस देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमास प्रशालेच्या विद्यार्थिनी, पालक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## सिध्देश्वर कॉलेज ऑफ फार्मसीमधे मतदान जन-जागृती

**लातूर /प्रतिनिधी:** जिल्हा परिषद आणि पंचायत समिती मतदान जन- जागृती साठी सिध्देश्वर कॉलेज ऑफ फार्मसी विद्यार्थीनी लोकनाट्य सादर केले.यामध्ये यश हाळे याने आपले मत आपले भविष्य मतदान करु चला चला जनहिताचे शासन आणू ' जागरुक मतदार लोकशाहीचा आधार तोच देश होईल महान ज्या देशात शंभर टक्के मतदान.अशा प्रकारे घोषवाक्ये सांगितले. महाविद्यालय च प्राचार्य डॉ.शामलीला भिमाशंकर बावगे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना . मतदान जागृती म्हणजे लोकांना मतदानाचे महत्व आणि त्यांचा अधिकार समजावून सांगणे, मतदान हे लोकशाहीचे हृदय आहे. असे त्याने सांगितले. तसेच दीक्षा गोरे, महेक तांबोळी, आदित्य, नविन चव्हाण, यश हाळे, सर्व विद्यार्थी नी सुंदर असे मतदान जनजागृती पथनाट्य सादर केले. या कार्यक्रमाचे सूत्र संचालन आयुष गुंजरगे याने केले. या कार्यक्रमास प्राचार्य डॉ.शामलीला बावगे,प्रा आकाश पाटील,प्रा.प्शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वर्ग उपस्थित होता.


**CHANGE IN NAME**

I HAVE CHANGE MY NAME FROM TABDIL AHMED NAZIR PASHA SAUDAGAR TO TAFJIL AHMEDNAZIRPASHA SAUDAGAR HENCE FROTH THIS DECLERATION AND WILL BE KNOWN BY THIS NAME I WILL USE. TAFJIL AHMEDNAZIRPASHA SAUDAGAR IN FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY MY CHILDREN AND FAMILY.
OLD NAME: TABDIL AHMED NAZIR PASHA SAUDAGAR
NEW NAME: TAFJIL AHMEDNAZIRPASHA SAUDAGAR
ADDRESS: C/O AHMEDNAZIRPASHA SAUDAGAR,INDIA NAGAR SHIVAJI NAGAR ,TQ ,NILANGA DIST-LATUR (M.S.) 413521


## विस्तारसेवा कार्य समिती अंतर्गत प्रजासत्ताक दिनानिमित्त भारतमाता व संविधान ग्रंथ पूजन उत्साहात संपन्न

**लातूर /प्रतिनिधी: येथील श्री केशवराज माध्यमिक विद्यालयाच्या विस्तारसेवा कार्य समिती अंतर्गत दि. २६ जानेवारी २०२६ वार सोमवार रोजी लातूर शहरातील प्रमुख चार चौकात भारत मातेच्या प्रतिमेचे व संविधान ग्रंथाचे पूजन करण्यात आले.**

यावेळी साई मंदिर चौकात भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य संजय गुरव, विद्यालयाच्या पर्यवेक्षिका इंदू ठाकूर, विशाल नगर परिसरातील नगरसेविका कांचनताई अजनीकर, कार्यक्रम प्रमुख लता कुलकर्णी तसेच आठवी ते दहावी विभागातील सर्व महिला शिक्षिका यांनी भारत मातेच्या प्रतिमेचे व संविधानाचे पूजन केले.

शिवाजी चौक येथे विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे, पर्यवेक्षक धनंजय कुलकर्णी, समाजसेवक शहाजी गणपतराव शिंदे, माता पालक, माजी विद्यार्थी, विस्तारसेवा कार्य समिती प्रमुख आदिनाथ कदम, कार्यक्रम प्रमुख प्रल्हाद माले, आठवी ते दहावी विभागातील शिक्षक कर्मचारी व परिसरातील नागरिक यांनी भारत माता व संविधानाचे पूजन केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौकात भारतीय संविधान, भारतमाता प्रतिमेचे पूजन करण्यासाठी भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे विद्यासभा संयोजक तथा विद्यालयाचे उपमुख्याध्यापक महेश कस्तुरे, पर्यवेक्षक राम जोशी, आर्वी येथील प्रतिष्ठित नागरिक तथा पालक, कार्यक्रम प्रमुख शैलेश सुपलकर, विस्तारसेवा कार्य समिती सहप्रमुख महादेव गोंदरकर, पाचवी ते सातवी विभागातील शिक्षक कर्मचारी व परिसरातील नागरिक उपस्थित होते.

अंबाहनुमान मंदिर येथे पूजन करण्यासाठी विद्यालयाच्या पर्यवेक्षिका राजश्री कुलकर्णी, अंजली निर्मळे, कार्यक्रम प्रमुख मेघा सूर्यवंशी, अंबा हनुमान मंदिराचे प्रमुख प्रकाश द्विवेदी, पालक, मंदिर परिसरातील उपस्थित नागरिक, पाचवी ते सातवी विभागातील सर्व महिला शिक्षिका यांची उपस्थिती होती. याप्रसंगी संविधानाचे महत्त्व विशद करण्यात आले.

विस्तारसेवा समिती अंतर्गत संपन्न झालेल्या या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे, केंद्रीय विद्यासभा संयोजक तथा उपमुख्याध्यापक महेश कस्तुरे, पर्यवेक्षक राजश्री कुलकर्णी, इंदू ठाकूर, अंजली निर्मळे, राम जोशी, धनंजय कुलकर्णी, विस्तारसेवा कार्य समिती संस्था प्रमुख जितेंद्र जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यालयातील विस्तारसेवा कार्य समिती प्रमुख आदिनाथ कदम व सहप्रमुख महादेव गोंदरकर यांनी परिश्रम घेतले.

## दादा गेले ..

आपले दादा गेले
अविश्वसनीय वृत्त
मना घडे अपघात
हो चक्काचूरचित्त

कार्यक्षम प्रियनेता
काळ करी निवृत्त
खोटेठरावे हे सत्य
अ स्वस्थ हे दुचित्त

काळ क्रौर्य अत्यंत
कसे ठरले निमित्त
मृत्यूसमोर हतबल
मरण अतिव व्रात्य

सकाळीसकाळीचं
का मावळेआदित्य
कर्तृत्वा पूर्णविराम
घालवूबसे अमात्य

पोशिंद्याला नेताना
का न थरारलादैत्य
कसा करावा सांगा
अवेळी विधी अंत्य

स्मृती रुपात हृदया
राही तव अधिपत्य
भावपूर्णश्रद्धांजली
घटना घडे अचिंत्य

**हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.

## राष्ट्रीय सेवा योजना ही श्रमसंस्कार आणि समाज प्रबोधनाची प्रभावी चळवळ - डॉ.दिगंबर नेटके



**लातूर /प्रतिनिधी:** राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरातून युवकांवर श्रमसंस्कार व्हावा, तरुणांकडून समाजसेवा घडावी, समाजाचे आपण काही देणे लागतो या भूमिकेतून राष्ट्रसेवा करण्याचे कार्य राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिराच्या माध्यमातून घडावे तसेच राष्ट्रीय सेवा योजना ही समाज प्रबोधनाची प्रभावी चळवळ आहे असे प्रतिपादन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे ओएसडी डॉ.दिगंबर नेटके यांनी यावेळी केले.

ते सरस्वती संगीत कला महाविद्यालय, लातूर येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने मौजे सेलू ता. औसा येथे दि.२४ ते ३० जानेवारी २०२६ दरम्यान आयोजित शाश्वत विकासासाठी युवक : जलसंधारण व्यवस्थापन आणि ओसाड भूमी विकास या विशेष वार्षिक युवक शिबिराच्या उद्घाटन समारंभाप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक बोलत होते. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या शुभहस्ते दीपप्रज्वलन करून सरस्वती मातेच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आली.

याप्रसंगी मंचावर अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष तालमणी डॉ.राम बोरगावकर हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे ओएसडी डॉ.दिगंबर नेटके तर उद्घाटक म्हणून श्री.बालाजी नारायण पाटील हे उपस्थित होते. याप्रसंगी मंचावर महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य पांडुरंग गोरे,प्रमुख पाहुणे म्हणून श्री. बाळासाहेब कदम, ग्रामपंचायत सदस्य श्री गणेश जाधव,श्री ज्ञानोबा पवार,राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ.बालाजी शिंदे आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रभारी प्राचार्य पांडुरंग गोरे यांनी केले,सूत्रसंचालन प्रा.डॉ. संतोष कुलकर्णी यांनी केले, पाहुण्यांचा परिचय प्रा.डॉ.बालाजी शिंदे यांनी करून दिला. उपस्थितांचे आभार प्रा.डॉ. सुदाम पवार यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेवक विद्यार्थी, विद्यार्थीनी,महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## सुर, ताल आणि नृत्याच्या कलाविष्काराने वसंत पंचमी हर्षोल्हासात साजरी

**लातूर /प्रतिनिधी:** येथील सरस्वती संगीत कला महाविद्यालय आणि श्री ज्ञानसरस्वती मंदिर संस्थानच्या वतीने ज्ञानसरस्वती सभागृह संगीत नगरी,बार्शी रोड,लातूर या ठिकाणी सुर ताल आणि नृत्याच्या कलाविष्काराने 'वसंत पंचमी' हर्षोल्हासात साजरी करण्यात आली.

या वसंत पंचमी संगीत महोत्सवात पुणे येथील सुप्रसिद्ध बालरोगतज्ञ तथा सुविख्यात गायिका विदुषी डॉ. के. एस. शेलुशा (पुणे) यांनी विलंबित वडाखाल ताल झुमरामध्ये सादर केला त्यानंतर त्यांनी छोटा ख्याल व रागमालिका सादर करून श्रोत्यांची दाद घेतली.शेवटी त्यांनी पद्मनाभा नारायणा हे भजन अतिशय तयारीने सादर करून रसिक श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.त्यांना तबलासाथ प्रा.विश्वनाथ स्वामी यांनी केली.तर हार्मोनियम साथ श्री.नरेंद्र भोसले यांनी केली.त्यानंतर मुंबई हायकोर्टचे विधीज्ञ विख्यात तबलावादक पं. नयन घोष यांचे पट्टशिष्य ॲडव्होकेट चैतन्य देशपांडे ( मुंबई ) यांनी दिल्ली फरुखाबाद घराण्याच्या पद्धतीने सोलो तबलावादन तयारीने सादर करून रसिकांची मने जिंकली. त्यांना उत्स्फूर्त हार्मोनियम साथ सुरमणी पं.बाबुराव बोरगावकर यांनी केली.या संगीत महोत्सवाच्या शेवटी मुंबई येथील सुप्रसिद्ध नृत्यांगना शिल्पा केळकर यांनी कथक मध्ये उठाण, आमद, गत, तोडे, चक्रधार सादर करून रसिक श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.त्यानंतर त्यांनी नृत्यनाटिका रामस्तुती सादर करून रसिकांना मंत्रमुग्ध केले.




या कार्यक्रमास सन्माननीय अतिथी म्हणून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडचे ओएसडी डॉ. दिगंबर नेटके,संयोजक तालमणी डॉ. राम बोरगावकर,सुरमणी पं.बाबुराव बोरगावकर,राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. मारोती गायकवाड व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ.रमाकांत घाडगे, सिनेट सदस्य डॉ.अशोक मोटे, सिनेट सदस्य श्रीमती डॉ.कुसुमताई मोरे,प्रा.डॉ.मल्लिकार्जुन करजगी यांची प्रमुख उपस्थिती होती.

या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रा. विश्वनाथ स्वामी,प्रा. लक्ष्मण श्रीमंगले,प्रा.राजेंद्र भोसले,सरस्वती संगीत कला महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी आणि कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.


**टोनर रिफिलिंग**



फक्त ₹ ३००/-
मास्टरप्लेट
ट्रेसिंग क्वालिटी
संपर्क
8600025070
9028376965
**प्रिंटर्स पॅराडाईस**
प्रिंटर रिपेअरिंग
कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस
टोनर रिफिलिंग

निलंगा शहरातील एलआयसी विमा भरण्याचे केंद्र
**सितारी विमा सेवा केंद्र**
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स, जनता दवाखान्यासमोर शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
**जमीरोद्दीन सितारी**
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क → Off: (02384) 242224, 9422612239, 9422658396



Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26

हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी–५२/२४–२६